नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर । पुणे । नाशिक । छत्रपती संभाजीनगर । बीड



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.

सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534 | अमोल सिताराम थोरात पा. 9764626533 | ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334



अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ३०३ | रविवार, दि. २३ फेब्रुवारी २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# भारत २०२७ पर्यंत पूर्ण विकसित राष्ट्र

## अमित शहांचा विश्वास; पुण्यातील जनता सहकारी बँकेच्या हीरक महोत्सवाचा समारोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशासमोर दोन संकल्प ठेवले आहेत. यामध्ये २०२७ पर्यंत या देशाला पूर्ण विकसित राष्ट्र बनवायचे आहे. तसेच २०२७ पर्यंत या देशातील अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरची करायची आहे.**

**हे दोन्ही संकल्प सहकारी क्षेत्राचा विकास केला नाही तर अपूर्ण राहतील, असे मत केंद्रीय गृह तसेच सहकारिता मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केले आहे.**

पुण्यातील जनता सहकारी बँक लिमिटेडच्या हीरक महोत्सवाचा समारोप त्यांच्या उपस्थित झाला. यावेळी ते बोलत होते.

अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह सहकारी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. अमित शहा दोन दिवसांच्या पुणे जिल्हा दौऱ्यावर असून या दरम्यान त्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली.

देशाला पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनल्यानंतर जर प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम नसेल. प्रत्येक परिवारात समृद्धीचा संकल्प पूर्ण झालेला नसेल, तर हे दोन्ही संकल्प अपूर्ण असल्याचे अमित शहा यांनी म्हटले आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या क्षमतेनुसार काम देणे आणि त्याला देशाच्या विकासासोबत जोडणे हे केवळ सहकारी चळवळीतून शक्य असल्याचे अमित शहा यांनी म्हटल आहे. त्यामुळेच मोदीजींनी सहकारिता मंत्रालय स्थापन केले असल्याचा दावा अमित शहा यांनी केले आहे.



सहकारातुन समृद्धी हा सहकारिता मंत्रालयाचा मूळ मंत्र असल्याचे देखील अमित शहा यांनी म्हटले आहे. अनेक पिढ्यांपासून जे काम झाले नाही, ते केवळ दहा वर्षात पूर्ण करण्याचे काम नरेंद्र मोदी यांनी केले आहे.

प्रत्येकाला घर, घरात पाणी, घरात वीज, शौचालय, प्रत्येकाला आरोग्य विमा आणि प्रत्येक व्यक्तीला अन्न, हे सर्व मोदीजींनी केले आहे. त्यामुळे आता आजपर्यंत ज्यासाठी संघर्ष करावा लागला ते सर्व मिळाले आहे. त्यामुळे आता त्यांना देशाच्या विकासात योगदान द्यायचे आहे. मात्र त्यांच्याकडे आता निधी नाही. त्यांना निधी मिळवण्यासाठी एक मात्र उपाय हा सहकारिता असल्याचे देखील शहा यांनी म्हटले आहे.

## कर्नाटकमध्ये महाराष्ट्राच्या एसटी चालकास मारहाण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** कर्नाटकात महाराष्ट्रातील बसला आणि बस चालकाला काळे फासण्याचा प्रकार शनिवारी सकाळी घडला होता. या घटनेमुळे राज्यात संताप व्यक्त होत असून पुण्यात या घटनेचे पडसाद उमटले. पुण्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कर्नाटकाच्या बसला काळे फासले. त्यासोबतच कर्नाटक सरकारच्या निषेधार्थ जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दुसरीकडे कोल्हापुरातही ठाकरे गट आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. शिवसैनिकांनी कर्नाटकच्या बसवर भगवा ध्वज फडकवला. महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बस चालकाच्या तोंडाला कर्नाटकात शुक्रवारी काळे फासण्यात आल्याची संतापजनक घटना घडली. या चालकाला कन्नड बोलता येत नव्हती. त्यामुळे कन्नड रक्षक वेदिकेच्या कार्यकर्त्यांनी हे कृत्य केले.

## देश-विदेश वृत्त

### बोगदा प्रकल्पाचा भाग कोसळला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तेलंगणा:** काल, शनिवारी सकाळी तेलंगणातील नागरकुरनूल



जिल्ह्यात एसएलबीसी (श्रीशैलम लेफ्ट बँक कॅनाल) बोगदा प्रकल्पाचा एक भाग कोसळला. ज्यामध्ये ६ मजूर अडकले. बोगद्याच्या प्रवेशद्वाराच्या आत १४ किमी अंतरावर हा अपघात झाला. अधिकाऱ्यांच्या मते, छताचा सुमारे तीन मीटर भाग कोसळला आहे. बोगद्याचे काम बराच काळ थांबले होते. चार दिवसांपूर्वीच काम पुन्हा सुरू झाले.तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी बोगदा अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. जिल्हाधिकारी, एसपी, अग्निशमन विभाग, हायड्रा आणि सिंचन विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले आहेत.केंद्रीय कोळसा मंत्री जी. किशन रेड्डी यांनीही बोगदा अपघाताच्या कारणांची माहिती मागवली आहे आणि अधिकाऱ्यांना अडकलेल्या लोकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यास सांगितले आहे.

### छत्रपती संभाजीराजांची बदनामी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** छत्रपती संभाजी महाराज यांच्या विषयी चुकीची माहिती विकीपीडियाने प्रसारित केली असल्याने विकीपीडियावर आता कारवाईचा बडगा उचलण्यात आला आहे. संभाजी महाराजांबद्दल वादग्रस्त लिखाण विकीपीडियावर टाकणाऱ्या लेखकांवर गुन्हा दाखल होणार आहे. विकीपीडियाला संभाजी महाराजांविषयीचा वादग्रस्त कंटेंट हटवण्यासाठी तीन दिवसांचा वेळ देण्यात आला होता. मात्र विकीपीडियाने कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे आता थेट कारवाईचा बडगा सायबर पोलिसांनी उचलला आहे. विकीपीडिया हे एक ओपन प्लॅटफॉर्म असल्याने काही लोकांना त्यांचे लिखाण त्यावर प्रकाशित करता येतात. सायबर सेलने जवळपास १० ते १५ ईमेल विकीपीडियला पाठवले असून त्यांच्याकडून एकही उत्तर आले नाही. त्यामुळे महाराष्ट्र सायबर सेलने संबंधित लेखकांवर गुन्हा दाखल केला आहे.

### पंचतारांकित हॉटेलला आग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबई विमानतळाच्या अगदी समोर असलेल्या पंचतारांकित हॉटेलला आग लागल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहिती मिळताच अग्निशामक दलाचे सात ते आठ बंब घटनास्थळी दाखल झाले आहेत. ही आग नेमकी कशामुळे लागली? याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. तसेच या आगीत कोणी अडकले आहे का? याचा देखील तपास केला जात आहे. मात्र आग मोठी असून हवेमध्ये धुराचे मोठे लोट दिसून येत आहे.

# नगर जिल्ह्याचा बिहार झालाय?

## खा. निलेश लंके यांचा संताप

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर :** गुंडगिरी पध्दतीने पोलीस व महसूल प्रशासनाचा गैरवापर करून कोणत्याही प्रकारची नोटीस न देता नागरीकांच्या मालमत्ता जमीनदोस्त करण्याचे काम सत्ताधाऱ्यांकडून करण्यात येत असल्याचे सांगत नगर जिल्ह्याचा बिहार झाल्याचा गंभीर आरोप करीत खा. निलेश लंके यांनी संताप व्यक्त केला.

गुंडगिरी पध्दतीने, पोलीस, महसूल प्रशासनाचा वापर करून कोणतीही नोटीस न देता सकाळी सात वाजता बुऱ्हानगर येथील अभिषेक भगत यांचे अडीच ते तीन कोटी रूपयांचे मंगल कार्यालय उध्वस्त करण्यात आले त्यानंतर खा. लंके यांनी काल जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेवून राजकीय आकसातून अशी कारवाई करणाऱ्या अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते.

खा. लंके म्हणाले, जिल्ह्यातील नागरीकांचे म्हणणे ऐकूण न घेता आकसापोटी त्यांचे अतिक्रमण सिध्द करून ते पाडण्याचा कट जिल्हयात गेल्या अनेक दिवसांपासून रचण्यात येत आहे. जो माणूस कायद्याच्या चौकटीत काम करतो, उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयात काम करणारे अभिषेक भगत हे बुऱ्हाणनगर देवीचे भक्त आहेत.

### टेंडर भरणारांना दमदाटी

महानगरपलिकेमध्ये स्क्रॅपचे टेंडर होते. त्या ठिकाणी काही गुंड प्रवृतीचे लोक बसवून ठेवले. कोणी टेंडर भरण्यासाठी आले तर त्यास दमबाजी करून तिथून काढून देण्यात आले. शेवटी मी माझ्या कार्यालयातील माणसाला महानगरपालिकेत पाठवून काही लोकांना टेंडर भरण्यास भाग पाडल्याचे खा. लंके यांनी सांगितले.

### तर आयुक्तांना पळता भुई थोडी होईल!

महानगरपालिकेतील कारनामे बाहेर काढले तर आयुक्तांना पळता भुई थोडी होईल. महापालिका व महसूल प्रशासनाने चुकीच्या पध्दतीने कारवाई करू नये. अधिकाऱ्यांना फोन केल्यावर ते आमच्यावर दबाव असल्याचे सांगतात. अधिकाऱ्यांवर दबाव आहे म्हणून तुम्ही लोकांना उध्वस्त करणार का? असा सवाल लंके यांनी केला.

## पंतप्रधानांच्या प्रधान सचिवपदी शक्तिकांत दास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली :** आरबीआयचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांची काल, शनिवारी पंतप्रधानांचे प्रधान सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली.



केंद्र सरकारच्या नियुक्ती समितीने जारी केलेल्या अधिसूचनेत असे म्हटले आहे की, पंतप्रधानांचे प्रधान सचिव २ म्हणून शक्तीकांत दास यांच्या नियुक्तीला मान्यता देण्यात आली आहे. ही नियुक्ती त्यांनी पदभार स्वीकारल्याच्या तारखेपासून प्रभावी होईल. त्यांची नियुक्ती पंतप्रधानांच्या कार्यकाळात किंवा पुढील आदेश येईपर्यंत सुरू राहील.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे माजी गव्हर्नर शक्तिकांत दास यांचा कार्यकाळ १० डिसेंबर २०२४ रोजी संपला. १२ डिसेंबर २०१८ रोजी शक्तीकांत दास यांची आरबीआय गव्हर्नर म्हणून नियुक्ती करण्यात आली. नंतर त्यांचा कार्यकाळ तीन वर्षांसाठी वाढविण्यात आला.

शक्तीकांत दास हे १९८० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. शक्तीकांत दास हे १९८० च्या बॅचचे आयएएस अधिकारी आहेत. ते तामिळनाडू कॅडरचे अधिकारी आहेत. मे २०१७ पर्यंत ते आर्थिक

पान ४

# आ. खताळांची 'चाय पे चर्चा'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर नगरपालिकेचे क्रीडा संकुल हे येथून मागे वर्षातून एकदाच उघडले जात होते. परंतु संगमनेरचे क्रीडासंकुल खेळ ण्यासाठी कायमस्वरूपी खुले करून द्यावे, अशी मागणी क्रीडा रसिकांमधून होत होती. त्या मागणीचा विचार करून हे क्रीडासंकुल तरुणांना खेळण्यासाठी उपलब्ध करून देत क्रिडाक्षेत्राला खऱ्या प्रोत्साहन देण्याचा माझा प्रयत्न राहणार असल्याचा विश्वास आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केला.



संगमनेर बसस्थानक कॉम्प्लेक्समधील उल्हास वाळे यांच्या जगदंबा टी सेंटरवर आ. अमोल खताळ चाय पे चर्चा करण्यासाठी आले होते. त्यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना ते म्हणाले की, संगमनेरच्या येथून मागच्या लोकप्रतिनिधींनी किरकोळ समस्या दुर्लक्षित ठेवल्या होत्या. परंतु, मला नुसता भपका करायचा नाही, अन संगमनेरची तुलना सिंगापूरशी करायची नाही, तर सो शहरी एक संगमनेरी हे मला माझ्या कामातून संगमनेरकर जनतेला दाखवून द्यायचे असल्याचे आ. खताळ यांनी ठणकावून सांगितले.

संगमनेर शहरातील प्रवरा नदीवरील गंगामाई घाटावर कॉंक्रिटीकरण केले. ते काही करण्याची गरज नव्हती, अशी काही ज्येष्ठ नागरिकांनी तक्रार केली आहे. त्यावर बोलताना आ. खताळ म्हणाले की, संगमनेरच्या प्रवरा नदीच्या परिसराची आज काय अवस्था झाली आहे. हे केवळ ठेकेदार पोसण्यासाठी त्यांचा खटाटोप सुरू आहे. पालिका चुकीमुळे दूषित पाणी

पान ४

# आ. धसांना चक्क... परळी तालुक्यामधूनच विरोध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**परळी :** बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात राज्यभरात आंदोलनाच्या माध्यमातून रान पेटवणारे भाजप आमदार सुरेश धस यांना आता परळी तालुक्यामधूनच विरोध होताना दिसत आहे. संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख आणि महादेव मुंडे यांच्या कुटुंब यांच्या भेटीसाठी सुरेश धस परळीमध्ये दाखल झाले होते. मात्र या दरम्यान सुरेश धस यांना तेथील नागरिकांनी काळे झेंडे दाखवत त्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सुरेश धस यांनी परळीची बदनामी केली असून ते स्वतःच गुंड असल्याचा आरोप या आंदोलकांनी केला आहे.



संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा तपास अंतिम टप्प्यात आहे. यातील फरार आरोपी कृष्णा आंधळेला अटक होणे गरजेचे असून त्यांना फरार करणाऱ्यांवरही कारवाई झाली पाहिजे. ग्रामस्थांच्या आठ मागण्या मान्य झाल्या तर त्यांना आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असे भाजप आमदार सुरेश धस यांनी म्हटले आहे. पंकज कुमावत यांना बीडचे ॲडिशनल एसपी म्हणून नियुक्त केले पाहिजे. तर पोलिसांचे

पान ४

# औरंग्याचे थडगे उखडून फेका

## सागर बेग; माळी चिंचोरेत शिवजयंतीनिमित्त धर्मसभा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** अनन्वित अत्याचार करूनही हिंदू धर्म न सोडणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांना हालहाल करून मारणाऱ्या औरंग्याचे थडगे महाराष्ट्रात आहे, ही तमाम हिंदूसाठी शरमेची बाब असून ते थडगे उखडून फेका, अशा मागणीचे स्टेट्स प्रत्येक हिंदू तरुणांनी आपल्या मोबाईलवर ठेवून तो संदेश शासनापर्यंत कसा जाईल, यासाठी प्रयत्न केला पाहिजे. औरंग्याच्या थडग्यावर कुत्रंही मुतणार नाही, त्यावर काही हिंदू जावून माथा टेकवतात, असे थडगे उखडून फेकावे लागेल, अशी वल्गना करणाऱ्या मुख्यमंत्री फडणवीस यांना तुमच्या स्टेट्समुळे बळ येईल, तरी त्यांनी ते कार्य नाही केले तर ती मोहीम आम्हालाच फत्ते करावी लागेल, अशी गर्जना राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष सागर बेग यांनी केली आहे.

नेवासा तालुक्यातील माळी चिंचोरा येथे शिवजयंती उत्सवानिमित्त राष्ट्रीय

पान ४

> माळी चिंचोरा गावातील हिंदूंच्या अंतर्गत वादाचा फायदा उठवत पुरातन गहनीनाथ मंदिराला जिहाद्यांनी गहीबी पीर करून टाकले आणि त्यावर आपलेच हिंदू माथा टेकवतात. त्या पवित्र मंदिराच्या ठिकाणी बोकड्यांचा बळी देतात. हा प्रकार आपल्या जन्मदात्या बापाला सोडून शेजारच्या अब्दुलला बाप म्हंटल्यासारखा आहे.
>
> **- सागर बेग, अध्यक्ष-श्रीराम संघ**


शिवधन पतसंस्था

कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर,

फोन नं. ०२४२२-२९९७८७

मो. नं. ९८५०६८८७८७





# ग्रामसचिवालय गावाच्या विकासाचे केंद्र

## पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील; कोल्हार खुर्दमध्ये ७६.५ लक्ष रुपयांच्या विविध विकासकामांचा शुभारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** कोल्हार खुर्द येथे नव्याने उभारण्यात आलेले ग्रामसचिवालय हे गावाच्या विकासाचे केंद्र आहे. या माध्यमातून नागरिकांच्या अपेक्षा पूर्ण होणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

राहुरी तालुक्यातील कोल्हार खुर्द येथे जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या हस्ते कोल्हार खुर्द ग्रामसचिवालयाच्या नवीन वास्तूचा लोकार्पण सोहळा पार पडला. यानिमित्ताने गावांमध्ये ७६.५ लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा शुभारंभ करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोल्हार खुर्दच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच अनिता शिरसाठ होत्या. याप्रसंगी माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के, प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे, तहसीलदार नामदेव पाटील, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता



बाळासाहेब शेटे, राहुरी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुधाकर मुंडे, सहाय्यक गटविकास अधिकारी एस. पी. तायडे, उपसरपंच विमल भोसले, उपविभागीय अभियंता एस. एस. घोरपडे, शाखा अभियंता के. जी. लांडे, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामविकास अधिकारी व ग्रामस्थ उपस्थित होते.

> सद्यस्थितीत जल वितरणाकरीता अनुसरण्यात आलेली स्काडा पद्धती का आपण स्वीकारली? हे मला अजूनही समजत नाही. यावर संबंधित अधिकाऱ्यांना देखील उत्तर देता येत नाही. मंत्रिमंडळाच्या बैठकीतदेखील आपण हा प्रश्न उपस्थित केलेला आहे.
>
> **- राधाकृष्ण विखे पाटील, पालकमंत्री**

मंत्री विखे पाटील म्हणाले, समुद्रात वाया जाणारे अतिरिक्त पाणी भंडारदरा व निळवंडे धरणात आणणे गरजेचे आहे. तरच पाण्याचे व्यवस्थित वितरण करता येईल. निळवंडे धरणातून पाईपलाईनद्वारे पाणी वितरित करण्याचे नियोजन आहे. यामुळे ३० ते ३५ टक्के पाण्याचा अपव्यय टाळता येईल, नवीन तंत्रज्ञान वापरण्याची आवश्यकता असून यावर विचार सुरू असल्याचे मंत्री विखे पाटीले म्हणाले.

यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, दत्तात्रय शिरसाठ यांची भाषणे झाली. राहुरी पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रा. दिगंबर शिरसाठ यांनी प्रास्ताविकामध्ये कोल्हार खुर्द येथील स्मशानभूमीचा प्रश्न, घनकचरा व्यवस्थापन, पाण्याची टाकी नदीकिनारी बांधावयाची संरक्षक भिंत आणि जिल्हा परिषद शाळेचे बीओटी तत्त्वावर पुनर्निर्माण करून गाळे बांधण्याच्या प्रश्नांकडे लक्ष वेधले. सूत्रसंचालन यमन पुलाटे यांनी केले. तर आभार माजी उपसरपंच राजेंद्र वर्पे यांनी मानले.

# डॉ. सोमण यांना कोहिनूररत्न पुरस्कार जाहीर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** तब्बल ५० वर्षपेक्षा अधिक काळ वैद्यकीय क्षेत्रातील कार्याची दखल घेत अकोले तालुक्यातील कोतुळ येथील डॉ. सुभाष केशव सोमण यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र कोहिनूररत्न पुरस्कार जाहीर झाला आहे.

आज रविवार २३ फेब्रुवारी रोजी नाशिक नगरीत मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे.

नाशिक येथील गुरू आराध्या फाउंडेशनच्या संस्थापक भागवताचार्य हभप अर्चनाताई आहेर गणोरेकर यांनी हे पुरस्कार जाहीर केले आहे. डॉ. एस. के. सोमण गेल्या ५० वर्षापासून आदिवासी ग्रामीण भागात अत्यल्प दरात आरोग्य सेवेचे काम करत आहे. हजारो रुग्णांचे प्राण त्यांनी वाचवले असून हजारो त्यांनी एमबीबीएस पदवी घेऊन शहरी भागात मोठे हॉस्पिटल न थाटता आदिवासी, ग्रामीण भागातील गोरीगरीब जनतेचे सेवा करण्याचे व्रत त्यांनी घेतले.

त्यांच्या आरोग्य क्षेत्रातील या सेवाभावी कामाची दखल घेऊन त्यांना 'महाराष्ट्र कोहिनूर रत्न' हा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या

व्यक्तीं व संस्थांचा दरवर्षी गुरु आराध्या फाउंडेशन च्या वतीने पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते

या वर्षीच्या कोहिनूर रत्न राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा आज, दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता नाशिक नगरीत नाईस संकुल, आय. टी. आय. सिग्नल जवळ, त्र्यंबक रोड, नाशिक येथे संपन्न होणार आहे.

# श्रीरामपुरच्या मिल्लतनगरातील पाण्याची पाईपलाईन फुटली

## नागरिकांच्या घरात शिरले पाणी; अतिक्रमणे काढा, अन्यथा नगरपालिका काढणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील मिल्लतनगर भागातील साठवण तलावाकडे जाणारी मुख्य पाईपलाईन जॉईंट वर लिकेज झाल्याने पाण्याच्या प्रवाहाने फुटली. त्यामुळे आसपासच्या घरांमध्ये पाणी शिरले.

सध्या प्रवरा कालव्याला पाण्याचे रोटेशन चालू असून तलावामध्ये पाणी घेण्याचे काम सुरू आहे. याबाबत माहिती देताना नगरपालिकेचे पाणीपुरवठा विभागाचे निलेश बकाल यांनी सांगितले की, मिल्लतनगर पुलापासून तलावापर्यंत चार फुट व्यासाची सिमेंट पाईपलाईन आहे. पुढे ती तीन फूट करण्यात आलेली आहे. याच पाईपलाईनवर आज पाण्याच्या प्रवाहामुळे जोड लिकेज झाल्याने अनेक ठिकाणी पाणी पाईपलाईनमधून बाहेर आले.

या परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात नागरिकांनी पाईपलाईनच्या शेजारी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे लिकेज झालेले पाणी त्या घरांमध्ये शिरले. संपूर्ण



पाईपलाईनच्या आसपास ६० ते ७० घरे असल्याने त्या ठिकाणी पाईपलाईन दुरुस्ती करणे सुद्धा आता अवघड झालेले आहे.

तसेच पाण्याचे रोटेशन लवकरच संपणार असल्याने पाणी थांबवणे अशक्य आहे. तरी देखील पालिकेच्या कर्मचाऱ्यांनी पाण्याचा प्रवाह कमी केला आहे. आज याबाबत दुरुस्ती करण्यात येईल. मात्र या परिसरातील नागरिकांनी आपली अतिक्रमणे जर काढली नाही, तर तलावात पाणी सोडता येणार नाही. म्हणून पाईपलाईन दुरुस्तीसाठी आसपासच्या नागरिकांनी आपली अतिक्रमणे ५ ते १० फुट काढून घ्यावी, अन्यथा नगरपालिकेला ती काढणे भाग पडेल, असा इशाराही देण्यात आला आहे.

सध्या नगरपालिकेमार्फत अतिक्रमण विरोधी मोहीम सुरू आहे. मुख्य जलवाहिन्या शहरातून ज्या ज्या भागातून गेलेल्या आहेत अशा प्रमुख १५ ठिकाणची अतिक्रमणे काढण्याचे नगरपालिकेने आधीच जाहीर केलेले आहे. मिल्लतनगर भागातील ही पाईपलाईन मुख्य असून या पाईपलाईनमुळेच साठवण तलावात पाणी साठवले जाते. सिमेंटची पाईपलाईन लिकेज झाल्याने आता पाणी बाहेर पडत आहे. त्याचा त्रास आसपासच्या नागरिकांना देखील होत आहे.

> संबंधित पाईपलाईनच्या शेजारील सर्व नागरिकांनी आपली अतिक्रमणे तातडीने काढून घ्यावी, अन्यथा नगरपालिकेला ती काढणे भाग पडेल, असे आवाहन नगरपालिका प्रशासनाने केले आहे.

# शिवसेना सदस्य नोंदणीसंदर्भात उद्या बैठक

## आ. अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे बैठकीला उपस्थित राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या आदेशाने शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना पक्षाच्या वतीने शिवसेना सदस्य नोंदणी सध्या संपूर्ण महाराष्ट्राभर सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून सदरील नोंदणी ही अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू आहे. याचीच आढावा बैठक सोमवारी शिर्डी येथे आयोजित करण्यात आली आहे.

या अभियाणा अंतर्गत शिर्डी मतदारसंघाचे निरीक्षक तथा नाशिक शिवसेना जिल्हा प्रमुख अजय बोरस्ते यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील आढावा बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती शिवसेना जिल्हा प्रमुख कमलाकर कोते व नितीन आऊतडे यांनी दिली आहे.या बैठकीला आ. अमोल खतळ, आ. विठ्ठलराव लंघे हे उपस्थित राहणार आहे. सदरील बैठकीस मोठ्या संखेने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा संघटक विजय काळे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हा प्रमुख जितेंद्र जाधव, महिला आघाडी जिल्हा प्रमुख विमल पुनडे, महिला आघाडी राहाता तालुका प्रमुख वनिता जाधव, तालुका प्रमुख सागर बोठे, कोपरगाव महिला आघाडी तालुका प्रमुख मीनाक्षी वाकचौरे यांनी केले आहे.

# 'सक्षम' अभियानांतर्गत संरक्षण क्षमता महोत्सवाचे आयोजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भारत सरकारच्या पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस मंत्रालयाच्या वतीने सक्षम अभियानांतर्गत दिनांक १४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान संरक्षण क्षमता महोत्सव हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. असल्याची माहिती हर्षद कुंभार यांनी दिली.

# कर्जत तालुक्यात दहावीची परीक्षा सुरळीत सुरू

## तालुक्यातील बारा केंद्रावर परीक्षा ; तालुक्यातून २३८२ विद्यार्थी बसले परीक्षेला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्यावतीने घेण्यात येणारी इयत्ता दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी २०२५ पासून सुरळीतपणे सुरू झाली आहे. या परीक्षेसाठी तालुक्यामधून २३८२ विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते. अशी माहिती एसएससी बोर्डाचे कर्जत येथील कस्टडीयन दशरथ धादवड यांनी दिली.

धादवड म्हणाले की,



कर्जत तालुक्यामध्ये इयत्ता दहावीची परीक्षा सर्वत्र सुरळीत सुरू झाली. ज्याप्रमाणे इयत्ता बारावीच्या परीक्षांमध्ये काटेकोरपणे सर्व केंद्रावर कॉपमुक्त अभियान राबवले. तसेच पद्धतीचे अभियान इयत्ता दहावीच्या परीक्षेमध्ये देखील राबवण्यात येणार आहे. बारावीच्या परीक्षेमध्ये कर्जत तलुक्यात अद्याप पर्यंत एकाही ठिकाणी कुठलीही तक्रार अथवा गुन्हा दाखल झालेला नाही.

परीक्षा केंद्रांवरील गैरप्रकार टाळण्यासाठी, मंडळाने विशेष उपाययोजना केल्या आहेत. ज्या परीक्षा केंद्रांवर पूर्वी गैरप्रकार आढळले होते, तेथे बारकाईने लक्ष देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. सर्व परीक्षा केंद्र सीसीटीव्ही अंतर्गत ठेवण्यात आले आहेत. परीक्षा कॉफी मुक्त होण्यासाठी जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा शिक्षण अधिकारी, तालुका गट विकास अधिकारी, तालुका शिक्षण अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व केंद्र संचालक यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

> परीक्षा हॉलमध्ये परीक्षा सुरू असताना सुपर वायझर यांना मोबाईल लिंक दिली आहे. त्या ठिकाणी मोबाईलद्वारे थेट प्रक्षेपण करण्यात येत आहे. सर्व परीक्षा केंद्रावर वेळेवर प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका पोहोच करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान कोणत्याही गैरप्रकारात सहभागी होवू देणार नाही.
>
> **– दशरथ धादवड**

# शेत जमिनीच्या बांधावरून वाद करणे भोवले

## शेतकऱ्यांची एकमेकांविरोधात आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** शेत जमिनीच्या बांधावरून शेतकऱ्यांची परस्परविरोधी आश्वी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती असे की, फिर्यादी प्रियंका संदिप कराड (वय ३५, रा. पानोडी, ता. संगमनेर) येथील गावठाण घरी आरोपी यांनी येवुन मळ्यातील बांधाचे गवत पेटवण्याचे कारणावरून कुरापत काढत फिर्यादीचे चुलत सासरे कैलास पांडुरंग कराड, फिर्यादी प्रियंका संदिप कराड, मावळण सासु हिराबाई जनार्दन ओबासे, विमल दगडु सांगळे, सुशीला बबन कराड, कमला कराड यांना लाकडी काठीने, हातोडी तसेच लोखंडाच्या गजाने मारहाण केली.

तसेच मारहाण करत गळ्यातील सोन्याचे मंगळसुत्र व मावळण सासु हिराबाई ओंबासे यांचे सोन्याचे गंठण तोडुन काढुन घेतले. यामध्ये जखमी झालेल्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र आश्वी खुर्द येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. प्रियंका कराड (वय ३५) यांनी दिलेल्या फिर्यादिवरून गुन्हा सुभाष पवार, मंगल पवार तसेच सुभाष पवार यांचा जावई रोहित सुभाष बोंदे (रा. शिबलापुर, ता. संगमनेर) तसेच विक्री विनोद कदम, प्रिपी लौकी अजमपुर येथील पिंजारी (पुर्ण नाव माहित नाही तसेच इतर दोन ते तीन व्याक्तीवर गुन्हा दाखल झाला आहे.

तर दुसऱ्या फिर्यादीत मंगल सुभाष पवार (वय ४५, रा. पानोडी, ता. संगमनेर) यांनी दिलेल्या फिर्यादिवरून फिर्यादिचे पती सुभाष हरीभाऊ पवार यांनी शेतातील वाळलेले गवत पेटुन दिले होते. यावरून आरोपी यांना समजुन सांगण्यासाठी गेले असता आरोपीने सुभाष हरीभाऊ पवार यांला शिवीगाळ केली. त्यामुळे जावई रोहित सुभाष बोंदे (रा. शिबलापुर) हा आरोपी यांच्या घराकडे समजुन सांगण्यासाठी गेले असता जावई यास काठीच्या साह्याने मारहाण करत तसेच लाथाबुक्याने मारहाण केली. तसेच आरोपी नं १ याने फिर्यादी व तिचे पतीस वाईट शिवीगाळ केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिली. यावरून कैलास कराड, कैलास कराड यांची भावजई सुशिला (पुर्ण नाव माहित नाही) कैलास कराड यांची दोन बहीणी विमल व कमल (पुर्ण नाव माहित नाही) बबन पांडुरंग कराड, संदिप बबन कराड (रा. पानोडी) यांच्यावर गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक पवार हे करत आहे.

# तिसगावातील वेश्या व्यवसायावर पोलिसांचा छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील तिसगाव येथील विशाल लॉजिंगवर स्थानिक गुन्हे शाखा व पाथर्डी पोलीस यांच्या संयुक्त पथकाने कारवाई करत लॉजिंगवर चालणाऱ्या कुंटणखान्यावर पिटा कायद्यांतर्गत कारवाई करत एका महिलेची सुटका केली आहे. तर लॉजिंग चालक नारायण भाऊसाहेब माने (वय ३७, रा. ढवळेवाडी, ता. पाथर्डी) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तिसगाव येथील विशाल लॉजिंगवर वेश्याव्यवसाय चालू असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखा व पाथर्डी पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी संबंधित लॉजिंगवर बनावट ग्राहक पाठवून खात्री केली असता वेश्याव्यवसाय चालू असल्याचे आढळून आले. यानंतर पोलिसांनी लॉजिंगवर



छापा टाकत नारायण भाऊसाहेब माने (वय ३७, रा. ढवळेवाडी, ता. पाथर्डी) याला पोलिसांनी ताब्यात घेतले.

माने हा महिलेकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे पीडित महिलेने यावेळी सांगितले. यानंतर पोलिसांनी पीडित महिलेची सुटका करत माने याच्यावर पिटा कायद्याअंतर्गत कारवाई करत महिला कॉ. ज्योती शिंदे यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे अतुल लोटके, संतोष खैरे, बाळासाहेब नागरगोजे, जालींदर माने, ज्योती शिंदे तसेच पाथर्डी पोलिस ठाण्याचे पोनि संतोष मुटकुळे, नितीन दराडे, ईश्वर बेरड, ज्ञानेश्वर सानप, संदीप बडे, राजु सुद्रीक, अंजु सानप आदींनी कारवाई केली आहे.

# संचालकांकडून मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेचा आढावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेच्या कामाचा इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे संचालक ज्ञानेश्वर खिल्लारी यांनी आढावा घेतला, योजनेचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.

जिल्हा परिषदेच्या सभागृहात आयोजित या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण संचालनालयाचे सहसंचालक प्रशांत शिर्के, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी देविदास कोकाटे, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक विनोद लोंढे आदी उपस्थित होते.

इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जामती प्रवर्गातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्तीचे सन २०२१-२२ ते २०२३-२४ या वर्षाचे प्रस्ताव जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे तर २०२४-२५ प्रस्ताव सहाय्यक संचालक इतर मागास बहुजन कल्याण विभाग यांच्याकडे शिफारशीसह सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या. बैठकीस जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

# शिवजयंती मिरवणुकीत डीजे वाजवून ध्वनीप्रदुषण : गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती मिरवणुकीदरम्यान मोठ्या आवाजात डीजे वाजवून ध्वनी प्रदूषण केल्याप्रकरणी पोलिसांनी विविध मंडळांचे अध्यक्ष आणि डीजे मालकांवर गुन्हे दाखल केले आहेत.

मिरवणुकीदरम्यान कर्णकर्कश आवाजात गाणी लावून, घोषणाबाजी करून आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे उल्लंघन केल्याने संबंधितांवर ही कारवाई करण्यात आली आहे. त्यानुसार कोतवाली आणि तोफखाना पोलीस ठाण्यांमध्ये संबंधितांवर भारतीय न्याय संहिता कलम २२३, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

# नवनाथ बलभीम कोक यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर येथील पाईपलाईन रोडवरील रहिवाशी नवनाथ बलभीम कोक (वय ५७) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, मुलगी, जावई, नात असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# पाणीपट्टी वाढ करणाऱ्या मनपा आयुक्तांना हटवा – नितीन भुतारे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** मनपाचे आयुक्त यशवंत डांगे यांनी ठराव करून पाणीपट्टी दरवाढ केली आहे. ही दरवाढ नागरिकांवर अन्याय करणारी आहे, असे नितीन भुतारे यांनी म्हटले आहे.एका बाजूला शहरात कल्याण रोड, सारसनगर, केडगाव, अशा अनेक भागात आठ ते दहा दिवसांनी पाणी येते.पाणी २४ तास नागरिकांना मिळत नाही. १५ वर्षापासून सुरू असलेली फेज टु योजनेचे काम अपूर्ण आहे. शहरात अनेक भागात टॅंकर द्वारे पाणीपुरवठा होतो हे सर्व असताना कोणत्या प्रकारे पाणी पट्टी दरवाढ आयुक्तांनी केली हे समजण्या पलीकडे आहे. पाणी पट्टी दरवाढ वाढवून पैसे जमा करायचे आणि पाणी पुरवठा लाईनवर देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करायचा, असे अनेक दिवसापासून मनपात सुरू आहे, असा आरोप केला.

# पेन्शनवाढीचा प्रश्न लवकर मार्गी लावणार : मंत्री मांडवीया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपुर :** इपीएस ९५ पेन्शनधारकांचा अनेक वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न लवकरच मार्गी लागेल थोडा विलंब झाला. आपल्या मागण्या पूर्ण करण्यासाठी वृद्धांच्या जीवन सुधारसाठी निरंतर काम चालू आहे. तुमचे आंदोलन शांततेत सनदशीर मार्गाने चालू आहे. त्याचा मला अभिमान आहे. यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीसुद्धा याबाबत आग्रही आहेत, असे स्पष्ट आश्वासन कामगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीया यांनी दिले.

नवी दिल्लीत राष्ट्रीय अध्यक्ष कमांडर अशोकराव राउत यांचे नेतृत्वाखालील शिष्टमंडळास दिले कामगार मंत्री यांनी बोलाविलेल्या बैठकीस राष्ट्रीय अध्यक्ष अशोकराव राऊत, राष्ट्रीय महासचिव वीरेंद्रसिंह राजावत, राष्ट्रीय सचिव रमेश बहुगुणा या बैठकीस उपस्थित होते.



यावेळी पेन्शनवाढ व पतीपत्नीस मोफत वैद्यकीय सुविधा त्याच प्रमाणे उच्च पेन्शनबाबत अर्जावरील त्रुटी,याबद्दल कामगार मंत्री यांच्याशी अतिशय सकारात्मक चर्चा होऊन लवकर तुम्हाला आनंद होईल. यासाठी विविध मतप्रणाली आहेत त्या बाजूला ठेवा. मी तुमचे काम नक्की करतो, असे डॉ. मांडवीया म्हणाले, असे पश्चिम भारत संघटक सुभाष पोखरकर यांनी सांगितले.

केंद्र सरकारच्या २०२५-२६ च्या बजेटमध्ये कोणतीही घोषणा न झाल्यामुळे देशातील पेन्शनधारकात असंतोष निर्माण झाला होता. त्यासाठी सत्ताधारी व विरोधी पक्षाचे असे २० खासदारांच्या भेटी पदाधिकारी यांनी घेतल्या व प्रश्न लोकसभेत मांडले. १० वर्षापसून न्यूनतम पेन्शनवाढीसाठी शांततेच्या मार्गाने देशातील ७८ लाख पेंशनधारकांसाठी अनेक आंदोलने केली त्याची दखल कामगार मंत्री यांनी घेतली व मला वृद्धांबद्दल खूप आदर आहे, असे मंत्री म्हणाले.

पेन्शनवाढ निश्चित होणार असल्याने पेन्शनधारकांमध्ये आनंदाचे वातावरण झाले आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- जुन्या कोर्टाच्या मागे, पावन गणपतीशेजारी, तांगे गल्ली, अहिल्यानगर, ४१४००१ येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, कार्य. संपादक : **महेश पोपट रक्ताटे**. पोस्टल परवाना क्र. SRP/139/2023-2026/ PRGI No. MHMAR/25/RAA11.

# त्या गटशिक्षणाधिकाऱ्यांकडून नाराजांचा शोध सुरु

## नेत्यांशी संवाद : माहिती देणाऱ्यांच्या नावांची यादी तयार

**महेश रक्ताटे**

**अहिल्यानगर** : जिल्ह्यातील एक गट शिक्षणाधिकारी कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयीन कामकाज करीत असून शिक्षकांना सायंकाळी सहानंतर कार्यालयात बोलवित असल्याचे वृत्त जनता आवाजने प्रसिध्द केले होते. या वृत्तामुळे शिक्षण वर्तुळात खळबळ उडाली आहे.

या गटशिक्षणाधिकाऱ्याने नेत्यांशी संवाद साधून याबाबतची माहिती कोण बाहेर देते, याचा शोध सुरु केलेला आहे. आपल्या तालुक्यातील नाराजांची यादी तयार केली असून त्या माध्यमातून माहिती देणाऱ्यांचा शोध या गटशिक्षणाधिकाऱ्याने सुरु केलेला आहे.

जिल्ह्यातील एका गटशिक्षणाधिकाऱ्यांचा कारभार मनमानी असल्याची चर्चा सध्या शिक्षकांमध्ये सुरु आहे. कोणी आवाज उठविला तर त्यांच्या तक्रारी वरिष्ठांकडे करून आवाज दाबून टाकण्याचा प्रकार



त्याा गटशिक्षणाधिकाऱ्याकडून केला जातो. तसे प्रकार झालेले आहे. या कामात ते गटशिक्षणाधिकारी काही नेत्यांना तर काही बाहेरील काही व्यक्तींना आपल्या जवळ बाळगून असल्याची चर्चा सध्या जिल्ह्यात सुरु आहे.ते गटशिक्षणाधिकारी कोण? याचीच चर्चा सध्या जिल्ह्यात सुरु झालेली आहे. तालुक्यातील शिक्षकांनी हा प्रकार खरा असून ते मोजक्याच लोकांना रात्रीच्या वेळी थांबून ठेऊन कामे करून घेत असल्याची चर्चा जिल्ह्यातील शिक्षकांमध्ये सुरु आहे. हे सर्व कामे करताना मोजक्याच लोकांना जवळ ठेवण्यात आलेले आहेत. आपण रात्रीचा जनता दरबार भरवितो, याची माहिती बाहेर कशी गेली, ही माहिती बाहेर कोण सांगू शकतो, याची माहिती या अधिकाऱ्याने शिक्षक नेत्याांकडून घेतली आहे. यावर काही शिक्षक नेत्यांच्या बैठका घेतलेल्या आहेत. त्यात मोजक्याच शिक्षकांची नावे पुढे आलेली आहेत. त्याातील कोणाचे संबंध पत्रकारांशी आहेत. याचा शोध त्या अधिकाऱ्याकडून घेतला जात असल्याची चर्चा शिक्षकांमध्ये सुरु आहेत. या अधिकाऱ्याने आपल्या कार्यकाळात कोण-कोणत्या शिक्षकांवर आपण कारवाई केली? याची माहितीच्या आधारे शिक्षकांची यादी केलेली आहेत. त्याातील कोण आहे का? याचाही शोध घेतला जात असल्याची चर्चा सध्या शिक्षकांमध्ये सुरु आहे.

### ते गटशिक्षणाधिकारी खूप कामदार

ते गटशिक्षणाधिकारी खूप कामदार आहेत. ते आल्यापासून तालुक्याचा दर्जा उंचावला असल्याचे काही शिक्षक नेते सांगत आहेत. हे सांगणारी मंडळी त्या गटशिक्षणाधिकाऱ्यांच्या जवळची आहे. त्यांची कामे त्या अधिकाऱ्याकडून होत असल्यामुळे ते सर्वजण त्याा गटशिक्षणाधिकारी कामदार असल्याचे सांगत आहेत.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

गेल्या अनेक दिवसांपासून जनता दरबार भरत असूनही त्यााकडे शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाल्याने शिक्षकांमधून आश्चर्य व्यक्त केले जात आहे. चुकीचा कारभारावर वरिष्ठांकडून पहिल्यापासूनच पडदा टाकण्याचे काम सुरु होते, अशीच चर्चा आता सुरु आहे.

### मागील वर्षातील ती चौकशी गुंडाळली

मागील वर्षी शिष्यवृत्ती संदर्भात त्या गटशिक्षणाधिकाऱ्यांची चौकशी होणार होती. मात्र ही चौकशीही गुंडाळण्यात आल्याची चर्चा आहे. मागील वर्षी जसा कारभार झाला तसाच कारभार आताही झालेला आहे. मात्र यावेळी अगोदरच केंद्रप्रमुखांकडून लेखी घेतल्याची चर्चा शिक्षकांमध्ये सुरु आहे.

---

# पारनेरची दादागिरी संपविण्याचे काम मतदारांनी केले -आ. दाते

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : खासदारकीच्या माध्यमातून जिल्ह्यात व पारनेर तालुक्यात असणारी दादागिरी होती , ती थांबवण्याचे काम नगर-पारनेर विधानसभा मतदारसंघांतील हुशार मतदारांनी केल्याने जिल्ह्या बरोबरच पारनेर तालुका शांत झाला आहे. मतदारांनी आपल्यावर जो विश्वास टाकला आहे. त्यांच्या विश्वासाला अजिबात तडा जाऊ न देता विकासकामे मोठ्या प्रमाणात करणार असल्याची ग्वाही आ. काशिनाथ दाते यांनी दिली.देवीभोयरे ग्रामस्थांच्या वतीने झालेल्या भव्य नागरी सत्कार करण्यात आला , त्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. भाऊसाहेब खिलारी होते. देवीभोयरेचे ग्रामदैवत असलेल्या अंबिका मातेच्या मंदीरात माजी उपसरपंच विकास सावंत व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेल्या नवसाची गुळतुला करुन नवसपूर्ती करण्यात आली.यावेळी भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष राहुल शिंदे , माजी नगराध्यक्ष विजय औटी, राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष रखमाजी कापसे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, युवक तालुकाध्यक्ष भास्करराव उचाळे, युवा नेते दिलीप दाते, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, भाजपचे सांस्कृतिक सेलचे जिल्हा उपाध्यक्ष विलासराव हारदे , इतर मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आ. दाते पुढे म्हणाले की , गेल्या ५ वर्षांपासून पारनेर तालुका दादागिरी सहन करत होता. आपण राजकीय क्षेत्रात गेल्या ४० वर्षांपासून आपण जे सामाजिक , राजकीय , शैक्षणिक काम केले , त्यावर विश्वास ठेऊन जनतेने दादागिरी ला जागा दाखवून देत , आपणास विधानसभा निवडणुकीत निवडून दिले. त्यामुळे तालुक्यातील शेती च्या पाणी प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्य देणार आहोत . विधानसभेत विविध सामाजिक प्रश्नांवर लक्षवेधी मांडल्यामुळे त्याची दखल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतली असून त्यांनी जातीने त्याकडे लक्ष दिल्याने मी लक्षवेधी द्वारे मांडलेले प्रश्न तातडीने मार्गी लागणार आहेत. कुकडी डावा कालवा व पिंपळगाव जोगा कालवा चे अस्तारीकरणाचा प्रश्न जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील ही स्वतः जातीने लक्ष घालून प्रत्यक्ष पाहाणी केल्याने मंजूर केला असून याचे ही लवकरच हे काम सुरू होत आहे. माजी खा. डॉ सुजय विखे पाटील यांनी गेली पाच वर्षात पारनेर तालुक्यात कोट्यवधी रुपयांची विकासकामे केली असून ३८६ कोटी रुपयाच्या आळेफाटा-शिरुर रस्त्यासाठी निधी मंजूर केल्याने दळण वळणाचा प्रश्न मार्गी लागणार आहे , या कामाचा लवकरच शुभारंभ होणार आहे. माजी खा. विखे यांनी पारनेर तालुक्या ला विकास कामांमध्ये कायम झुकते माप दिले , पण विरोधकांनी सातत्याने त्यांच्या विरोधात नकारात्मक प्रचार केल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण केला. तालुक्यातील विविध विकास कामे प्रलंबित असून आपण सातत्याने पाठपुरावा करून ती कामे पूर्ण करणार असल्याची ग्वाही ही देत, पिंपळगाव जोगा धरणाचे काम मार्गी लावण्यासाठी आज रविवारी अळकुटी येथे बैठक घेणार असल्याची माहिती ही आ . दाते यांनी दिली.

---

# श्रीरामपुरात २३ फेब्रुवारीला वधू-वर सूचक मेळावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : उम्मती फाउंडेशन आणि रॉयल मॅरेज ब्युरो श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमानाने रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी मुस्लिम वधू-वर सूचक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत खासदार गोविंदराव आदिक अँग्लो उर्दू हायस्कूल वार्ड क्रमांक २ जामा मशिदीच्या मागे हा मेळावा होणार आहे, अशी माहिती आयोजक समितीच्या वतीने देण्यात आली.

या निमित्ताने डॉ. शेख यांच्या वतीने दिव्यांग व्यक्तींना व्हीलचेअरचे वाटप देखील करण्यात येणार आहे. उम्मती फाउंडेशन या सेवाभावी संस्थेमार्फत गेल्या दहा वर्षांपासून तालुक्यात मोफत आरोग्य शिबिरे, आधारकार्ड, शिधापत्रिका कॅम्प, दिव्यांग व्यक्तींना साहित्यावाटप इत्यादी विविध समाजोपयोगी कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. या मेळाव्यात विविध पदवीधर, उच्चशिक्षित, अविवाहित तसेच घटस्फोटीत अशा वधू-वरांना मोफत स्थळ दाखवण्यात येणार आहे. तरी या मेळाव्यात जास्तीत जास्त मुस्लिम बांधवांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन सोहेल शेख (दारुवाला), डॉ. तौफिक शेख, डॉ. अस्लम सय्यद व आयोजक समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

---

# रोटरी क्लबचे गव्हर्नर साबू यांची भेट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रो. डॉ.सुरेश साबू यांनी रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीला भेट देऊन विविध उपक्रमांची माहिती घेतली. यावेळी त्यांच्यासोबत रोटरी डिस्ट्रिक्टच्या फस्ट लेडी निर्मला साबू तसेच असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन प्रसन्ना खाजगीवाले हे उपस्थित होते.



डॉ. सुरेश साबू व रो. प्रसन्ना खाजगीवाले यांनी रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटीने तयार केलेल्या रोटरी ऑक्सिजन पार्कला भेट देवून तेथील वृक्ष लागवडीची पाहणी केली. त्यानंतर समर्थ विद्यालयात उभारण्यात आलेल्या कंपोस्ट खत प्रकल्पाची पाहणी करून विद्यालयाच्या परिसरात डॉक्टर सुरेश साबू व रोटरीन प्रसन्न खाजगीवाले यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. सुरेश साबू व रो. प्रसन्ना खाजगीवाले यांचा मानचिन्ह देऊन रोटरीचे अध्यक्ष राजेंद्र जगताप व सचिव काकासाहेब काकडे यांनी सन्मान केला. रोटरी क्लब ऑफ कर्जत सिटी करीत असलेल्या सामाजिक कार्याबद्दल समाधान व्यक्त करत रोटरीचे अध्यक्ष राजेंद्र जगताप व सचिव काकासाहेब काकडे यांचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर डॉ. सुरेश साबू यांनी कौताक केले.

---

# पैसखांब मंदिरात विद्यार्थ्यांनी केले पसायदानाचे वाचन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नेवासा येथील पैस खांब मंदिरात ज्ञानोदय इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी ज्ञानेश्वरीतील पसायदानाचे सामुहिक वाचन केले. संत ज्ञानेश्वर म ाऊलींनी ज्या पैस खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली त्याा ठिकाणी प्रत्याक्ष ज्ञानेश्वरी वाचनाचा अनुभव मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला.

माहिती व जनसंपर्क महासंचालनाल याच्यावतीने ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्या संमेलनाच्यानिमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या अंतर्गत शिक्षणाधिकारी कार्यालयाच्या सहकाऱ्याने जिल्हा शिक्षणाधिकारी अशोक कडूस यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड, ज्ञानोदय विद्यालयाचे प्राचार्य रावसाहेब चौधरी, ह.भ.प. वेदांतचार्य देवीदास महाराज म्हस्के, ह.भ.प. सचिन महाराज पवार, मराठी विषयाचे अध्यापक काकासाहेब काळे, संदीप ढेरे आदी मान्यवर उपस्थित होते.



### नेवासा हे अत्यंत महत्वाचे स्थान

गटशिक्षणाधिकारी शिवाजीराव कराड म्हणाले, मराठी भाषेच्यादृष्टीने नेवासा हे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना इथे केल्याने ही भूमी पवन आणि ऊर्जा देणारी आहे. आपले ज्ञान वाढविण्यासाठी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतील पुस्तके वाचून त्याातील आशय समजून घेण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

---

# नेवासा पंचायत समितीकडून ५६९२ घरकूल लाभार्थ्यांना अनुदान वितरण - आ.लंघे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा पंचायत समिती कार्यालयात आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मधील तालुक्यातील ५६९२ घरकुल लाभार्थ्यांना पहिल्या हप्त्यांचे वितरण करण्यात आले.



केंद्रीय गृहमंत्री अमित शहा,राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत शनिवार (दि.२२) फेब्रुवारी रोजी दुरदृष्यप्रणालीव्दारे हा कार्यक्रम संपन्न झालेला असतांना नेवासा पंचायत पंचायत समिती कार्यालयामध्ये आमदार विठ्छलराव लंघे - पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये नेवासा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय लखवाल,घरकुल विभागाचे अधिकारी आणि विविध शाखेच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या उपस्थित झालेल्या या कार्यक्रमात नेवासा तालुक्यातील एकुण घरकुल लाभार्थी उदिष्ठ ७२४० असतांना एकुण ७०५० घरकुलांना मंजुरी मिळालेली असून पहिल्या टप्प्यातील ५६९२ घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर अनुदान वितरित करण्यात आल्याची माहीती झालेल्या कार्यक्रमात पंचायत समिताच्यावतीने यावेळी देण्यात आली. यावेळी बोलतांना आमदार विठ्ठलराव लंघे - पाटील म्हणाले की,देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टी कोनातून प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा २ मध्ये तालुक्यातील ५६९२ घरकुल लाभार्थ्यांच्या खात्यावर निधी वर्ग करण्यात आलेला असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यामुळे तालुक्यातीलच काय? तर देशातील गोरगरीब मानसाला सुद्धा हक्काचा निवारा देण्याचा स्त्युत्य उपक्रम पंतप्रधामंत्रि मोदी यांच्या संकल्पनेतून मिळालेला असून नेवासा तालुक्यातील कुटूंबांना प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ देण्यात आलेला असून आणखी लाभार्थ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार असून सर्वांना हक्काचा निवारा देण्यासाठी शासन यंत्रणा दक्षर झालेली आहे कोणताही लाभार्थी घरकुलापासून वंचित राहणार नसून तळागाळातील सामान्य गोरगरीब सामान्य जनतेला लाभ मिळण्याच्या सुचना पंचायत समितीला दिल्याचे यावेळी आमदार लंघे - पाटील यांनी यावेळी ही माहीती दिली.

---

# शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा सुरु

## तनपुरेंनी आंदोलनाचा इशारा देताच प्रशासनाला जाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : महाविकास आघाडी शासन काळात शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा व्हावा म्हणून सौरउर्जा प्रकल्पाची निर्मिती केली. मात्र श्रेयवादाच्या भानगडीत राज्य शासनाने शेतकऱ्यांना सौरउर्जेच्या लाभापासून वंचित ठेवण्याचा प्रकार सुरू केला आहे. वांबोरी (ता. राहुरी) येथील सौरप्रकल्प सुरू करावा म्हणून माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी आंदोलनाचा ईशारा देताच महावितरण प्रशासनाने खडबडून जागे होत सौर प्रकल्प प्रारंभ होऊन वांबोरी परिसरामध्ये शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा सुरू झाला आहे.



माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी पत्रकार परिषदेत म्हणाले, महाविकास आघाडी शासनाने सन २०१९ च्या सत्तास्थापनेनंतर कर्जमाफीचा ऐतिहासिक निर्णय घेतला. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांची वीज समस्या कमी व्हावी म्हणून भरीव कामे करताना दिवसा वीज मिळावी म्हणून सौर कृषी वाहिनी प्रकल्पाअंतर्गत राहुरी परिसरात तत्कालिन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते सौर सबस्टेशन निर्मितीचे काम केले. याम ध्ये बाभूळगाव, वांबोरी व आरडगाव येथे सौर उर्जा प्रकल्पाचे काम सुरू केले होते. महाविकास आघाडी शासन असताना संबंधित प्रकल्पांना म ोठी गती मिळाली होती. सत्ताकाळात केवळ बाभूळगाव येथील सौर कृषी प्रकल्पाचे काम सुरू झाल्यानंतर शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा झाला. परंतु वांबोरी व आरडगाव येथील सौर कृषी प्रकल्पबाबत मात्र सत्ता बदलानंतर शिंदे-फडणवीस शासनाने दुर्लक्ष केले. वांबोरी व आरडगाव प्रकल्प पूर्ण झाला. वांबोरी प्रकल्पाचे काम पूर्ण होऊनही शेतकऱ्यांना दिवसा सौर दुर्लक्षित प्रकल्प कार्यान्वित करण्यासाठी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. रास्ता रोको आंदोलनाचा ईशारा देत नाही तोच महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जागे होत वांबोरी येथील सौर प्रकल्प कार्यान्वित केले. २ फिडर क्षमतेच्या ५६ वीज रोहित्राच्या माध्यम ातून शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळण्याचा मार्ग सुकर झाला.

### आता आरडगाव सौर प्रकल्प सुरू व्हावा

आमदार असताना अधिवेशनात राज्य शासन विरोधात बाभूळगाव सौर प्रकल्प पूर्ण होऊनही दिवसा वीज मिळत नसल्याने शासनाला जेरीस आणले. परिणामी चालू अधिवेशनातच उर्जा खात्याने बाभूळगाव प्रकल्प सुरू करून शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून दिली. आताही वांबोरी सौर प्रकल्पासाठी रस्त्यावर उतरण्याचा निर्णय घेताच शासनाने जागे होत प्रकल्प सुरू केला. आरडगाव सौर प्रकल्प ५ मे. वॅटचा आहे. त्याचेही काम पूर्ण असून तो लवकर प्रारंभ करावा. अन्यथा त्यासाठी सुद्धा रस्त्यावर उतरू, असा ईशारा प्राजक्त तनपुरे यांनी दिला.

---

# आत्मनिर्भरतेतून विकसित भारताकडे नेणारा अर्थसंकल्प

## ना.राधाकृष्ण विखे पाटील; माध्यमांशी संवाद साधला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेला हा सर्वसमावेशक अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने आणारा मार्ग अधिक प्रशस्त करणारा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीयांची बचत बाढणार असून त्यांची क्रयशक्ती उंचावल्याने देशाच्या विकासाला चालना मिळेल. १४० कोटी भारतीयांच्या आशा-आकांक्षा पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प असून विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेतील, असा विश्वास जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला. नागरिकांची बचत वाढून तेच देशविकासाचे भागीदार कसे बनतील, यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी नमूद केले.




पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या म ार्गदर्शनाखाली केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सितारामन् यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाची माहीती देण्याकरीता ना. विखे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला शहर जिल्ह्याचे अध्यक्ष अभय आगरकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, विनायक देशमुख, जिल्हा बँकेचे संचालक अंबादास पिसाळ, सचिन पारखी आदि याप्रसंगी उपस्थित होते. ना. विखे पाटील म्हणाले की, शेतकरी, गरीब, महिला आणि युवा हे विकसित भारताचे चार प्रमुख स्तंभ असून या चारही गटांच्या सशक्तीकरणासाठी अर्थसंकल्पाने महत्वपूर्ण पावले उचलली आहेत. सामाजिक क्षेत्र, नहान मुले व गुषाशिक्षण, पोषण तसेच आरोग्यापासून स्टार्टअप्स आणि गुंतवणुकीपर्यंत प्रत्योक क्षेत्राला गती देणात्याा तरतुदी करण्यात आल्या आहेत. हा अर्थसंकल्प गरीब आणि मध्यमवर्गीयांना सशक्त करणार असून तरुणांना रोजगाराच्या बसंख्य संधी निर्माण करणारा आहे, असा विश्वास त्याांनी व्यक्त केला.

---

# कोपरगाव शहरातील रस्त्यांनी घेतला मोकळा श्वास

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जेऊर कुंभारी** : कोपरगाव नगरपरिषदेने २०११ मध्ये मोठे अतिक्रमण काढले होते. आजची ही तिसरी सर्वात मोठी कारवाई म्हणावी लागेल. ही मोहीम पुढील पाच दिवस अशी सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले. याबाबत शहरातील मुख्य रस्त्यावरील ६०५ अतिक्रमणधारकांना नगरपरिषद प्रशासनाने नोटीसा बजावल्या होत्या.

शहरातील मुख्य रस्त्यावरील अनधिकृत अतिक्रमणे नगरपरिषद अतिक्रमण पथकाने मागील दोन दिवसांपासून नगरपरिषदेचे कर्मचारी महसूल विभागाचे कर्मचारी त्याचप्रमाणे महावितरण व पोलीस प्रशासनाच्या बंदोबस्तात मुख्य रस्त्यावरील कच्ची पक्की दुकाने तसेच पत्र्याचे शेड व रस्त्याच्याकडेला असलेले ओट्याचे बांधकामासह असे लहान-मोठे सर्व अतिक्रमणे हटविल्याने शहरातील मुख्य रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे.



याबाबत नगररचना विभागाच्या सहाय्यक नगर रचनाकार अश्विनी पिंगळ यांनी सदरची अतिक्रमणे झालेल्या भागाची पाहणी करून प्रांताधिकारी माणिक आहेर तहसीलदार महेश सावंत मुख्याधिकारी सुहास जगताप शिर्डी विभागाचे पोलीस उपअधीक्षक शिरीष वमणे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक भगवान मथुरे तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संदीप कोळी यांच्या संयुक्त पथकाने १५२ कर्मचाऱ्यांसह ४ डंपर ४ जेसीबी ५ ट्रॅक्टर व अतिक्रमण काढण्यासाठी लागणाऱ्या साहित्यांसह अतिक्रमण मोहिमेला सुरुवात करण्यात आली. या पथकामध्ये तहसील विभागातील नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते व नायब तहसीलदार चंद्रशेखर कुलथे हे देखील आपल्या ३५ कर्मचाऱ्यां समवेत या अतिक्रमण पथकामध्ये सहभागी झाले होते.

# संपादकीय

## ...तर चेंगराचेंगरी टळली असती?

जानेवारी ते फेब्रुवारी महिन्यातील चेंगराचेंगरीची ही तीसरी आणि मोठी भयावह घटना घडली.या घटना आपण स्वतःहुन ओढवल्याचे दिसून येते. मनुष्य हा बुध्दीजीवी प्राणी आहे. त्याला सर्वच गोष्टींचे ज्ञान आहे.दिल्ली रेल्वे स्टेशनवर ऐवढी भयावह गर्दी का निर्माण झाली त्याची प्रशासनाने दखल का घेतली नाही? किंवा गर्दी रोखण्यासाठी रेल्वे प्रशासनाने योग्य पाऊल का उचलले नाही? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. लोक श्रध्देने महाकुंभाला जाण्यासाठी निघाले, त्याचबरोबर प्रशासनाला कल्पना नक्कीच असावी की देशातील अनेक भागातुन नागरिक कुंभमेळ्यात जात आहे त्यामुळे भारतातील अनेक राज्यांच्या रेल्वे स्टेशनवर अफाट गर्दी वाढली आहे याबाबतची माहिती असुन सुद्धा राज्य सरकार व रेल्वे प्रशासन गफलतीत का बसली किंवा रेल्वे प्रशासनाचा हलगर्जीपणा तर नाही! याची चौकशी होणे गरजेचे आहे. कारण केंद्र सरकार, राज्य सरकार व रेल्वे प्रशासन यांना कल्पना आहे की महाकुंभाकरीता देशातील अनेक भागांतुन करोडोंच्या संख्येने लोक आवागमन करीत आहे.त्याच पध्दतीने दिल्ली सरकार किंवा भारतीय रेल्वे प्रशासनाने योग्य पाऊल न उचलल्याने दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ शनिवारला रेल्वे स्टेशनवर चेंगराचेंगरी भयावह घटना घडली यात १८ लोकांचा मृत्यू झाला तर १५ पेक्षा जास्त लोक गंभीररीत्या जखमी झाल्याचे सांगितले जाते.ही अत्यंत दुःखद आणि अंगावर शहारे येणारी घटना आहे.अशाचप्रकारे मौनी अमावस्येच्या निमित्ताने प्रयागराजच्या महाकुंभमध्ये त्रिवेणी संगमात अमृतस्नान करण्यासाठी २८ जानेवारी मंगळवारला मध्यरात्री भाविकांची अचानक गर्दी उसळली.यामध्ये चेंगराचेंगरी होऊन ३० भाविकांचा मृत्यू झाला व ६० हुन अधिक जण जखमी झाले.ही अत्यंत दुःखद आणि वेदना देणारी घटना घडली.जगात धार्मिक स्थळाला भेट देण्याकरता भारतातील प्रयागराज हे एकमेव ठिकाण असे आहे की याठिकाणी आतापर्यंत करोडो लोकांनी गंगा स्नान केले हा सुद्धा एक इतिहासच म्हणावा लागेल.चेंगराचेंगरीचे प्रकार गर्दी वाढल्याने होत असतात. चेंगराचेगरीसारख्या घटना पुन्हा-पुन्हा होवू नये यासाठी दिल्ली सरकारसह भारतातील संपूर्ण राज्यांनी सतर्कता बाळगली पाहिजे.कारण आपल्या सामोर झालेल्या संपूर्ण घटना डोळ्यासमोर ठेवून पुढील कार्यक्रमाचे पाऊल देशातील राज्य सरकारांनी अंगीकारले पाहिजे.यामुळे चुका लक्षात येईल व जीवीत हानी टाळता येईल.आश्चर्याची गोष्ट म्हणजे या अगोदर प्रयागमध्ये अशाच प्रकारच्या घटना झालेल्या आहेत आणि त्याही मौनी अमावस्येला पहिली घटना १९५४ मध्ये झाली तेव्हा मौनी अमावस्येच्या अमृत स्नानच्यावेळी चेंगराचेंगरी झाली यात ८०० पेक्षा जास्त श्रध्दालुंचा मृत्यू झाला.यानंतर २०१३ ला मौनी अमावस्येच्या दिवशी प्रयागराज रेल्वे स्टेशनवर अचानक चेंगराचेंगरी झाली यात ४२ लोकांचा मृत्यू झाला. अशा घटना वारंवार होवू नये यासाठी सरकारने व प्रशासनाने अलर्ट मोडवर असने गरजेचे आहे. उसळलेल्या गर्दीने दरवर्षी कुठे ना कुठे चेंगराचेंगरीचा प्रकार दिसून येतात आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला तर ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले.देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण, रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि होत आहे याचे जिवंत उदाहरण आपल्याला दिल्ली रेल्वे स्टेशनवर दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, आयोजकांनी, मंदिर प्रशासनाने, रेल्वे प्रशासनाने,स्थानिक प्रशासनाने व सरकारने केला पाहिजे. कारण भाविकांनी भीड करायची आणि रेल्वे प्रशासनाने दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते. भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये गर्दीच्या आणि चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात, असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. २७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी रेल्वे प्रशासनाने व राज्य सरकारांनी गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. प्रयागराजमधील कुंभमेळावा १३ जानेवारीला सुरू झाला व त्याची सांगता २६ फेब्रुवारीला होईल. तब्बल ४५ दिवसांचा हा भव्य कार्यक्रम आहे.त्यामुळे भाविकांनी चेंगराचेंगरीची गंभीर घटना पहाता पुढील पाऊल सावधगिरीने उचलावे व रेल्वे प्रशासन,स्थानिक प्रशासन,आयोजक व सरकारने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करुन सहकार्य करावे.जेनेकरून पुन्हा चेंगराचेंगरीसारख्या घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घ्यावी.

# तापमानवाढीचा शिक्षणालाही फटका



पर्यावरण

हवामानबदलामुळे केवळ वातावरणच बदलत नाही, तर शिक्षणावरही गंभीर परिणाम होत आहे. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालानुसार २०२४ मध्ये अत्यंत प्रतिकूल हवामानामुळे ८५ देशांमधील २४२ दशलक्ष मुलांचे शिक्षण विस्कळीत झाले. याचा अर्थ जगभरातील दर सातपैकी एका विद्यार्थ्याच्या शिक्षणावर तापमानवाढीचा परिणाम झाला. हवामानबदलाच्या या अनपेक्षित परिणामाचा खास मागोवा.

'ग्लोबल वॉर्मिंग'ने आपले दार ठोठावले आहे, ही वस्तुस्थिती कोणापासूनही लपलेली नाही. विक्रमी उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत होत असतानाच शेतीवरही नवे संकट उभे ठाकले आहे; विशेषतः भारतासारख्या देशात, जिथे बहुतांश शेती मॉन्सूनच्या पावसावर अवलंबून आहे. सर्वात मोठे संकट आपल्या कृषी क्षेत्रापुढे उभे ठाकले आहे, जिथे घटत्या उत्पादकतेमुळे आपली अन्नसुरक्षा धोक्यात आली आहे; मात्र आता 'नेचर क्लायमेट चेंज' या नियतकालिकात प्रसिद्ध झालेला अहवाल धक्कादायक असून त्यात भारतातील सुमारे साडेपाच कोटी मुलांचे शिक्षण उष्णतेच्या लाटेमुळे विस्कळीत झाल्याचे समोर आले आहे. हे संकट जगभर असले, तरी दक्षिण आशियातील इतर देशांच्या तुलनेत जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारतात त्याचा परिणाम अधिक दिसून आला आहे. २०२४ मध्ये उष्णतेच्या लाटेमुळे भारतातील शिक्षण व्यवस्थेवर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम झाला. हा धक्कादायक गौप्यस्फोट 'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड (युनिसेफ)'च्या 'लर्निंग इंटरप्टेड: ग्लोबल स्नॅपशॉट ऑफ क्लायमेट-रिलेटेड स्कूल डिसरप्शन इन २०२४' या अहवालात करण्यात आला आहे. उल्लेखनीय आहे की आजपर्यंत 'ग्लोबल वॉर्मिंग'चा शेतीवर आणि हवामानाच्या चक्रावरील परिणामांबाबत अभ्यासाचे निष्कर्ष बाहेर आले आहेत; परंतु मुलांसाठी असा कोणताही संवेदनशील अभ्यास समोर आला नव्हता. या अहवालाने एकीकडे पालकांची चिंता वाढवली, तर दुसरीकडे हवामानबदलाचा मुलांवर आणि शिक्षणावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी लवकरात लवकर प्रभावी धोरणे आखण्यासाठी सरकारवर दबाव आणला.

निःसंशयपणे, हा अभ्यास देशाच्या धोरणकर्त्यांना इशारा देतो की हवामान बदलाच्या परिणामांपासून मुलांचे संरक्षण करण्यासाठी केवळ शिक्षणच नव्हे, तर आरोग्य इत्यादीसारख्या इतर क्षेत्रांमध्येही मोठ्या प्रमाणावर काम करण्याची गरज आहे. शिक्षणतज्ज्ञांसोबतच वैद्यकीय क्षेत्रातील लोकांनीही या ज्वलंत मुद्द्यावर विचारमंथन करणे आवश्यक आहे. कारण २०५० पर्यंत मुलांवर उष्णतेच्या लाटांचा प्रभाव आठपटीने वाढेल, असा या अभ्यासाचा अंदाज आहे. गेले वर्ष शतकाहून अधिक काळातील सर्वात उष्ण वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. २०२४ हे वर्ष १९०१ नंतरचे सर्वात उष्ण वर्ष ठरले असल्याची माहिती हवामान खात्यानेही दिली होती. देशातील तसेच जगातील हरितगृह वायूंवर नियंत्रण ठेवण्यासाठी लवकरच जागतिक सहमती झाली नाही, तर येत्या काही वर्षांमध्ये तापमानात आणखी वाढ होऊ शकते. त्याचा मुलांच्या शिक्षणावरच नव्हे, तर आरोग्यावरही विपरीत परिणाम होईल.

जागतिक तापमानवाढीच्या संकटामुळे मुलांच्या शिक्षणात व्यत्यय आल्यास त्यांच्या भविष्यावर घातक परिणाम होईल, असा इशारा संयुक्त राष्ट्रांच्या बाल निधीने दिला आहे. उष्णतेच्या लाटेत लहान मुलांना शाळेत जाणे शक्य होत नाही. पालकही अभ्यासापेक्षा आरोग्याला प्राधान्य देतात. अशा परिस्थितीत शाळेच्या वेळेत बदल करून आणि वाढत्या उष्णतेशी संबंधित खबरदारीबद्दल जागरूकता वाढवून या संकटाचा मुकाबला करता येईल. याशिवाय, तापमानवाढीच्या आपल्या जीवनावर होणाऱ्या परिणामांचे मूल्यमापन करण्यासाठी देशात व्यापक अभ्यास आणि संशोधन करण्याची गरज भासू लागली आहे. वेळीच पावले न उचलल्यास दीर्घकालीन होऊ शकतात. 'युनिसेफ'ने उद्धृत केलेला अभ्यास हा ओस्लो विद्यापीठातील संशोधकांचा निष्कर्ष आहे. भारतीय विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनीही असा प्रयत्न केला पाहिजे; जेणेकरून, स्थानिक अभ्यासामुळे भारतीय परिस्थितीनुसार अधिक प्रामाणिक निष्कर्ष पुढे येऊ शकतील. ओस्लो विद्यापीठाच्या अभ्यासातील उल्लेखनीय तथ्य म्हणजे भारत जागतिक तापमानवाढीच्या परिणामांबाबत अधिक संवेदनशील असल्याचे म्हटले आहे. गेल्या वर्षी तापमानवाढीच्या परिणामांमुळे जगभरातील २४ कोटी मुलांचे शिक्षण विस्कळीत झाले आहे. हवामानातील व्यत्ययामुळे मोठ्या संख्येने मुले शाळेत जाऊ शकली नाहीत. परीक्षेच्या निकालांच्या परिणामामुळे मुलांच्या भविष्यावर दीर्घकालीन प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

गेल्या वर्षी उष्णतेच्या लाटेमुळे शिक्षणात सर्वात मोठा अडथळा निर्माण झाल्याचे अहवालात म्हटले आहे. याचा १७.१ कोटी मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल म्हणतात, 'मुलांना उष्णतेचा जास्त त्रास होतो. त्यांचे शरीर लवकर गरम होते. त्यांना कमी घाम येतो आणि शरीर थंड होण्यास जास्त वेळ लागतो. मुले वर्गात लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. तिथे थंड वातावरण नाही. वाटेत पूर आला किंवा शाळा उद्ध्वस्त झाली तर मुले शाळेत जाऊ शकत नाहीत.' एप्रिल महिन्यात भारत, बांगलादेश आणि फिलीपिन्स सारख्या देशातील ११.८ कोटी मुलांचे शिक्षण प्रचंड उष्णतेमुळे प्रभावित झाले होते.

फिलीपिन्समध्ये वातानुकूलित नसलेल्या हजारो शाळा बंद कराव्या लागल्या. दक्षिण आशियातील हवामानामुळे १२८ दशलक्ष मुलांवर परिणाम झाल्याने शिक्षण सर्वाधिक विस्कळीत झाले. भारतात उष्णतेमुळे ५.४ कोटी मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला, तर बांगलादेशमध्ये ३.५ कोटी मुलांच्या शिक्षणावर परिणाम झाला. २०२२ मध्ये पाकिस्तानमध्ये आलेल्या भयावह पुरानंतर कोट्यवधी मुलांवर शिक्षणाचे संकट आले होते. गेल्या सप्टेंबरमध्ये 'यागी'सारख्या चक्रीवादळामुळे पूर्व आशिया आणि पॅसिफिक प्रदेशात मोठ्या प्रमाणावर विद्ध्वंस झाला. १८ देशांमध्ये वर्ग पुढे ढकलावे लागले. तज्ज्ञांच्या मते, पूर ही एक सामान्य हवामान आपत्ती बनली आहे. यामुळे मुलांना शाळेत जाण्यापासून रोखले जाते. ओस्लो विद्यापीठातील मानसशास्त्रातील पोस्टडॉक्टरल फेलो डॉ. कॅटलिन एम. प्रेंटिस आणि त्यांच्या सहलेखकांनी यावर तपशीलवार संशोधन केले आहे.

'नेचर क्लायमेट चेंज' या जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या या संशोधनानुसार पुरामुळे मुलांना शाळेत जाण्यात अडथळा येतो, शाळेच्या इमारती आणि साहित्याचे नुकसान होते. अभ्यास आणि परीक्षांच्या निकालावर त्याचा परिणाम होतो. तापमानवाढीमुळे आधीच उपेक्षित समुदायांवर अधिक परिणाम होतो. डॉ. प्रेंटिस आणि त्यांच्या सहकाऱ्यांना संशोधनात आढळून आले की असुरक्षित समुदायांना हवामान संकटाचा सर्वाधिक त्रास होतो. अमेरिकेत, कमी उत्पन्न असलेल्या जिल्ह्यांमधील आणि अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या परीक्षेच्या निकालांवर उष्णतेचा वाईट परिणाम झाला. फिलीपिन्समध्ये आलेल्या सुपर टायफूननंतर, श्रीमंत मुलांपेक्षा गरीब कुटुंबातील मुलांनी शाळा सोडण्याचे प्रमाण जादा होते. मुलींच्या शिक्षणावरही या संकटाचा खोलवर परिणाम झाला आहे. मुलींच्या शिक्षणाला आधीच कमी प्राधान्य मिळते. त्यामुळे अनेक ठिकाणी हवामानाच्या संकटामुळे त्यांचे शिक्षण आणखी विस्कळीत झाले आहे. 'युनिसेफ'च्या आकडेवारीनुसार, जगातील दोन तृतीयांश मुले दहा वर्षांच्या वयापर्यंत एकत्र अभ्यास करू शकत नाहीत. हवामानाच्या आपत्तींमुळे हे शैक्षणिक संकट आणखी वाढले आहे. हवामान आपत्तींचा मुलांच्या शिक्षणावर दीर्घकालीन परिणाम होतो. उष्णतेचा प्रभाव केवळ शाळेच्या दिवसांपुरता मर्यादित नाही.

संशोधनात असेही आढळून आले की जास्त प्रमाणात गरम दिवस अनुभवावे लागल्याने चाचणी परिक्षांचे निकाल खराब होतात. आश्चर्याची बाब म्हणजे वातावरणीय आपत्तीमुळे गर्भधारणेदरम्यानही मुलांवर परिणाम होतो. उदाहरणार्थ, सँडी या चक्रीवादळाच्या संपर्कात आलेल्या गरोदर महिलांना 'एडीएचडी' हा विकार जडण्याची शक्यता जास्त होती. युनिसेफ आणि तज्ज्ञांनी हवामानबदलाच्या परिणामांपासून शिक्षण व्यवस्थेचे रक्षण करण्याचे आवाहन केले आहे. 'शिक्षण ही सर्वात जास्त प्रभावित झालेल्या सेवांपैकी एक आहे; परंतु धोरणात्मक चर्चांमध्ये त्याकडे दुर्लक्ष केले जाते. मुलांचे भविष्य सर्व हवामान नियोजन आणि कृतीच्या केंद्रस्थानी असणे आवश्यक आहे. डॉ. प्रेंटिस आणि त्यांच्या टीमने त्यासाठी उपाय सुचवले आहेत. शाळांमध्ये थंड हवेची व्यवस्था, पूररोधक संरचना आणि आपत्ती व्यवस्थापन योजना लागू केल्या पाहिजेत. याशिवाय सामाजिक आणि आर्थिक विषमताही दूर करावी लागेल. हरितगृह वायू उत्सर्जन कमी करून 'ग्लोबल वार्मिंग' थांबवणे आज सर्वात महत्त्वाचे आहे. शिक्षण केवळ हवामान बदलाशी लढा देण्यास मदत करत नाही, तर मुलांना संकटांचा सामना करण्यास सक्षम बनवते, असे संशोधकांनी म्हटले आहे.

**-मिलद बेंडाळे,**
**पर्यावरण अभ्यासक**

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## आ. खताळांची 'चाय पे चर्चा'

नदीपात्रात सोडले जात आहे. मला संगमनेरमधील आणि नदी लगतच्या गावातील जनतेची सुद्धा काळजी घेऊन काम करायचे आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. संगमनेर बसस्थानकातील अनेक गोर गरिबांकडून जास्त पैसे घेऊन ठेकेदाराने गाळे करारनामा केला असून त्यात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला आहे. आता काही गाळेधारक यांनी माझ्याकडे तक्रार केली आहे. त्यानुसार परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांना विनंती करणार आहे. यापूर्वी झालेला व्यवहाराची चौकशी करून गोरगरीब जनतेची झालेली लुटमारमधून पुन्हा पैसे गाळेधारक यांना मिळवून देण्याचा माझा प्रयत्न राहणार असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले. यावेळी अविनाश थोरात, संजय क्षत्रिय, शिवसेनेचे शहरप्रमुख दिनेश फटांगरे, आरपीआयचे शहराध्यक्ष कैलास कासार, शशिकांत घोलप, आप्पा कोळपकर, राहुल भोईर, सौरभ देशमुख, बापूसाहेब देशमुख, निसार शेख, बबलू काझी, मज्जू जाहागीरदार यांच्यासह बसस्थानक परिसरातील गाळे धारक आणि तरुणांशी आ. खताळ यांनी मन मोकळ्या गप्पा मारल्या.

## औरंग्याचे थडगे उखडून फेका

श्रीराम संघाचे सागर बेग यांची जाहीर धर्मसभा योद्धा प्रतिष्ठान सामाजिक संघटनेने आयोजित केली होती. याप्रसंगी ते बोलत होते. सभेच्या अध्यक्षस्थानी इंद्रजीत चिंधे हे होते. बेग म्हणाले की, डिजेपुढे अश्लील नाचण्यापेक्षा महाराजांच्या मूर्तीला मनोभावे अभिवादन करा आणि आपल्या महाराजांचा खरा इतिहास कसा लोकांपर्यंत जाईल, त्यासाठी धर्मसभा, व्याख्याने ठेवा जेणेकरून कबरीवर जाऊन माथा टेकवणाऱ्या आपल्याच भरकटलेल्या हिंदुंना आपल्या धर्माचे महत्व कळेल. ज्यांनी आपल्या हिंदू धर्मासाठी बलिदान दिले, त्यांचे बलिदान कसे विसरले जाईल. हेच आजपर्यंत कॉंग्रेस सरकारने पाहिले आहे. खरा इतिहास लपवुन खोटा इतिहास सांगणाऱ्या टोळ्या कॉंग्रेसने पैदा केल्या होत्या. त्यामुळे सत्तर वर्षात या अधर्मी जिहाद्यांचे बळ वाढले होते. परंतु आता सत्य आणि खरा इतिहास लोकांपुढे यायला लागला आहे. आपल्याच देवतांच्या मंदिरांवर कब्जे करून त्याला पीर, मजार सारखे थर्डक्लास नावे देऊन हिंदू धर्मावर अतिक्रमण करण्याचे उद्योग पूर्वी झालेत ते आता आपल्याला सगळं पुसायचे आहे.आपल्या पूर्वजांचा रक्तरंजित इतिहास बघितला, तर प्रत्येकांनी आपल्या हिंदू धर्मासाठी खूप मोठा त्याग बलिदान दिलेले आहे. महाराजांच्या सैन्यात कधीही मुसलमान सैनिक नव्हते, पण कॉंग्रेसच्या पैशांवर पोसणाऱ्या ब्रिगेड सारख्या संघटनांनी महाराजांचा खोटा इतिहास लोकांमध्ये पसरविण्याचे खूप मोठे पाप केले आहे. सागर बेग पुढे म्हणाले की, पीर हा नेमका काय प्रकार आहे. जरा मोबाईलवरील गुगलवर सर्च करून बघा तुम्हाला त्याबद्दल खरी माहिती मिळेल. आपल्या हिंदूंचे जो मोठ्याप्रमाणात धर्मांतर करेल हिंदूवर अन्याय अत्याचार करेल तो मेल्यावर त्याचे बांधलेल्या थडग्याला या हिंदू धर्मविरोधी विधर्मी जिहाद्यांनी हिरवी चादर चढवून पीर करून टाकले आणि त्यावर सर्वात जास्त माथा टेकवायला आणि त्यावर पैसे उधळायला बाटलेले हिंदूच जातात. त्यामध्ये आता बदल करण्याची वेळ आली असून त्यासाठी प्रत्येक हिंदूंच्या घरा घरात जागृती होणे गरजेचे असल्याचे सागर बेग यांनी यावेळी ठणकावून सांगितले. भारतात दुसरा पाकिस्तान तयार होऊनही वक्फ बोर्डाच्या ताब्यात जमीन शिल्लक राहील, एवढ्या मोठ्या भूखंडावर या जिहादी वक्फ बोर्डाचा कब्जा आहे त्यामध्ये दिवसेदिवस वाढ होत असून तो धोका आपल्या घरापर्यंत येऊन ठेपलाय जात पात विसरून केवळ हिंदू म्हणून एकजूट राहिल्यावरच येणारे हे संकट थांबणार आहे अन्यथा आपला विनाश अटल असल्याचे सागर बेग यांनी सांगितले. भाजपायुमोचे नेवासा तालुकाध्यक्ष प्रतापराजे चिंधे यांचेही याप्रसंगी प्रास्ताविक भाषण झाले. माळी चिंचोरा गावातील योद्धा प्रतिष्ठानचे अजिंक्य रक्ताटे, सागर चिंधे, सार्थक चिंधे, सुदर्शन चिंधे, विजय धानापुणे, वैभव देव्हारे तसेच पुरुषोत्तम चिंधे यांनी मान्यवरांचे स्वागत करून सत्कार केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक अशोक गाढे यांनी केले.

## पंतप्रधानांच्या प्रधान सचिवपदी शक्तिकांत दास

व्यवहार सचिव होते. ते देशाचे २५ वे गव्हर्नर बनले. नोव्हेंबर २०१६ मध्ये जेव्हा नोटाबंदी झाली, तेव्हाही दास मुख्य आघाडीवर होते. दास यांनी विविध पदांवर काम केले आहे. दास यांनी १५ व्या वित्त आयोगाचे सदस्य म्हणूनही काम पाहिले. दास यांनी ब्रिक्स, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि सार्कमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. ते दिल्लीच्या स्टीफन्स कॉलेजमधून पदव्युत्तर पदवीधर आहेत.

## आ. धसांना चक्क... परळी तालुक्यामधूनच विरोध

हेड बदलले तर पोलिसही बदलावे अशी मागणी त्यांनी मस्साजोग मध्ये देशमुख कुटुंबीयांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी बोलताना केली आहे. त्यानंतर धस यांनी महादेव मुंडे यांच्या कुटुंबीयांची देखील भेट घेतली. दरम्यान परळी शहरात त्यांना नागरिकांनी काळे झेंडे दाखवत धस यांनी परळीची बदनामी केली असल्याचा आरोप केला आहे. सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यामध्ये खलनायकाची भूमिका सुरू केली आहे. ती खलनायकाची भूमिका बीड जिल्ह्यातील कोणत्याही सुज्ञ नागरिकाला आवडत नाही. बीड जिल्हा क्रांतिकारकांची आणि संतांची भूमी आहे. या भूमीमध्ये सुरेश धस यांनी जाणीवपूर्वक बीड जिल्ह्यातील केवळ वंजारी कर्मचाऱ्यांना टार्गेट केले असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. महिला कर्मचारी आणि पोलिसांवरही सुरेश धस यांनी बेमालूम पद्धतीने आरोप केले आहे. त्यांचा आम्ही जाहीर निषेध करत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे हे आंदोलन पंकजा मुंडे यांच्या परळी तील घराच्या अगदी जवळ झाले.

## मराठी नाट्यसृष्टीचे वैभव

मराठी नाटकाचा आणि रंगभूमीचा आरंभ विष्णुदास भावे यांच्या नाट्यकाऱ्याने झाला असे आपण मानतो परंतु त्याही आधी नाटक-रंगभूमिनिर्मितीचे जे प्रयत्न झाले आहेत, तेही तितकेच महत्वाचे आहेत. त्यांतील एक म्हणजे लोकरंगभूमीचा आणि दुसरा प्रयत्न तंजावरच्या राजांनी लिहिलेल्या नाटकांचा.

विष्णुदास भावे यांच्या अगोदर म्हणजे १८४३ पूर्वी, मराठी रंगभूमी संघटित स्वरूपात मूर्त झालेली नव्हती परंतु कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, सोंगीभजन, खेळे, दशावतार, ललित, तमाशा, गोंधळ, बोहाडा, वासुदेव, कीर्तन आदी जे अनेक कलाप्रकार जनमानसात रूढ होते, त्यांत तिची बीजे दिसून येतात. हे कलाप्रकार म्हणजे लोकरंगभूमीचीच रूपे म्हणावी लागतील. ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, आदींच्या वाङ्मयातून या लोकरंगभूमीचे उल्लेख आढळतात प्रत्यक्ष रंगभूमीचे अथवा तिच्यासाठी आवर्जून लिहिलेल्या नाटयसंहितांचे रूप, प्रत्यक्ष पुरावे मात्र आढळत नाहीत.

अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन, दिल्ली
२०२५

विष्णुदास अमृत भावे यांनी १८४३ साली 'सीतास्वयंवर' नाटकाच प्रयोग करून एक नाट्यपरंपरा आरंभित केली. १८४२ साली कर्नाटकातून सांगलीस आलेल्या 'भागवत' नावाच्या नाटक मंडळीने केलेले खेळ पाहिल्यानंतर विष्णुदासांनी त्यातला आवश्यक तो भाग घेऊन आणि काही वेगळेपण ठेवून आपल्या सीतास्वयंवर ह्या नाट्याख्यानाचा प्रयोग केला व पुढे आणखीही नाट्याख्याने लिहिली.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी वाङ्मयाचा परिचय मराठी समाजातल्या सुविद्य मंडळींना होऊ लागला. इंग्रजी आणि संस्कृत नाटकांची भाषांतरे करणे ह्या गोष्टीचे आकर्षण त्यांतील काहींना वाटू लागले. १८५१ साली पहिले भाषांतरित नाटक मराठीत प्रसिद्ध झाले. या कालखंडात ही जी भाषांतरित नाटके होती, त्यांना पुढे 'बुकिश नाटके' अशी संज्ञा प्राप्त होण्याचे कारण म्हणजे ह्या भाषांतरित नाटकांना योग्य प्रमाणात प्रयोगरूप लाभत नव्हते. बहुधा ती नाटके ग्रंथरूपाने बंदिस्त होऊन राहात. त्यांतल्या काहींनाच प्रयोगाचा योग आला. विष्णुदास भावे यांच्या नाटकांची अपूर्वाई १८६५ नंतर ओसरू लागली. याच काळात पौराणिक-ऐतिहासिक नाटकांच्या बरोबरीने 'फार्स' या प्रकाराचा प्रयोग होत असे. फार्स म्हणजे केवळ विनोदी स्वरूपाचे, प्रहसनवजा असलेले नाट्य अशी जी पुढे समजूत झाली, ती या फार्सांच्या जन्माच्या वेळची नव्हती. काही ऐतिहासिक स्वरूपाच्या गंभीर अथवा शोकान्त नाटकांनासुद्धा फार्स म्हणण्याची पद्धत होती. उदा., नारायणराव पेशवे यांच्या मृत्यूचा फार्स, अफझुलखानाच्या मृत्युचा फार्स.

मराठीतील पहिले श्रेष्ठ संगीत नाटककार अण्णासाहेब किर्लोस्कर हे होत. संगीत शांकुतल (१८८०) आणि संगीत सौभद्र (१८८२) ह्या नाटकांमुळे त्यांचे नाव मराठी नाटककारांत अग्रेसर राहिले आहे. निर्भेळ आणि सात्त्विक रसनिर्मिती हे किर्लोस्करांच्या नाट्यनिर्मितीमागचे सूत्र होते. किर्लोस्करांनी केवळ नाट्यलेखनच केले नाही, तर आपण लिहिलेली नाटके त्यांनी रंगभूमीवर आणली. गोविंद बल्लाळ देवल, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर, राम गणेश गडकरी, न.चि.केळकर, भार्गवराम वरेरकर, चिंतामणराव कोल्हटकर, अनंत काणेकर, आचार्य प्र.के. अत्रे, वि.वा शिरवाडकर, ना.सी.फडके, वि.स.खांडेकर पु.ल.देशपांडे, वसंत शंकर कानेटकर, विजय तेंडुलकर, विद्याधर गोखले, विजय तेंडुलकर, पुरुषोत्तम दारव्हेकर, पुरुषोत्तम बेर्डे, वसंत सबनीस, विश्राम बेडेकर, दादा कोंडके, रणजीत देसाई, गो.नी.दांडेकर, श्री.ना.पेंडसे, जयवंत दळवी, रत्नाकर मतकरी, रणजीत देसाई, पु.शि. रेगे, चिं.त्र्यं. खानोलकर, लक्ष्मण देशपांडे असे अनेकांचे नाट्यसृष्टीला मोलाचे योगदान आहे. १९६० ते १९८० या दोन दशकांच्या कालखंडात नाटक आणि रंगभूमीच्या संदर्भात बरीच घडामोड झालेली आहे. नवनवीन नाट्यसंस्था कार्यमग्न झाल्या. नवा जाणता प्रेक्षकवर्ग निर्माण झाला. रंगभूमीचे वातावरण चैतन्यदायी बनले.

प्रायोगिक लेखकांनी एकांकिकालेखनातही फार मौलिक भर टाकली आहे. अनंत काणेकर, मो.ग. रांगणेकर ह्यांच्यापासून मराठी एकांकिकांचे लेखन जाणतेपणाने सुरू झाले आणि त्या प्रकाराला प्रतिष्ठा मिळाली विजय तेंडुलकरांच्या लेखनामुळे. त्यांनी एकांकिकांचा चेहराच बदलून टाकला. एकांकिका लेखनाला, प्रयोगांना जी प्रतिष्ठा लाभली, त्या प्रतिष्ठेला अनेक नाट्यसंस्था कारणीभूत झाल्या. एकांकिकांप्रमाणेच बालनाट्ये, कामगारांसाठी नाटके लिहिली जात आहेत. एकपात्री किंवा बहुरूपी स्वरूपाचे खेळ सुरू झाले आहेत.महाराष्ट्र शासनाच्यावतीने आणि अन्य खाजगी संस्थांच्यावतीने लहानमोठ्या अनेक स्पर्धा घेतल्या जातात, त्यामुळे नवे विषय, नवे आशय रसिकांसमोर मांडले जातात. ह्या स्पर्धांमुळे नाटकाचे वातावरण सर्वत्र निर्माण झाले. नाट्यशिक्षणाचे महत्वही वाढत आहे. या क्षेत्रात अनेक नवे आणि स्वागतार्ह प्रयोग होता आहेत. या प्रयत्नांमुळे मराठी नाट्यसृष्टी अधिकाधिक समृद्ध होत आहे.

**संकलन-जिल्हा माहिती कार्यालय, अहिल्यानगर**
**(संदर्भ-मराठी विश्वकोश)**

# कृषी पदवीधारकांनी ज्ञानाचा उपयोग शेतकरी हितासाठी करावा

## डॉ. उत्तमराव कदम; ॲग्री क्लिनिक आणि ॲग्री बिझनेस प्रशिक्षणाचा समारोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** कृषी पदवीधारकांनी त्यांच्या ज्ञानाचा उपयोग शेती उत्पादन वाढी बरोबरच त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी करावा. उद्योजकतेला जोड देत असताना शेती व्यवसायातून शेतकऱ्यांचा फायदा कसा होईल यासाठी प्रयत्न करावे आणि या माध्यमातून शेती क्षेत्राला चालना द्यावी, अशी अपेक्षा कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम यांनी व्यक्त केली.

कृषि मंत्रालय भारत सरकार, मॅनेज हैंद्राबाद नाबार्ड पुणे आणि कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ॲग्री क्लिनिक आणि ॲग्री बिझनेस प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी डॉ. कदम बोलत होते. यावेळी पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. दादासाहेब खोगरे, कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, शांताराम सोनवणे, भरत दवंगे, डॉ. विलास घुले, डॉ. विठ्ठल विखे डॉ. प्रियंका खर्डे, संज्जला लांडगे आदींसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

४५ दिवसाच्या प्रशिक्षणामध्ये कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षणार्थींना विविध ठिकाणी प्रक्षेत्र भेटी, प्रत्यक्ष कार्यानुभावाद्वारे शिक्षण, विविध प्रकल्प अहवाल तयार करणे, विविध योजना, संवाद कौशल्य, मार्केटिंग जाहिरात तंत्रज्ञान, सोशल मीडियाचा वापर आदी विषयावरती तज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये २६ प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते. यामध्ये महिला प्रशिक्षणार्थी महिला सहभाग हा मोठा होता.



संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ३३ प्रशिक्षणातून संपूर्ण राज्यामध्ये ॲग्री क्लिनिक आणि ॲग्री बिजनेसच्या माध्यमातून कृषी उद्योजक घडवण्याचे काम कृषी विज्ञान केंद्राने करत आज देशात हे केंद्र अव्वल स्थानावर राहिले आहे. या माध्यमातून ५६० कृषी उद्योजकांनी स्वयंरोजगाराबरोबरच रोजगार निर्मिती केली आहे.

**- डॉ. दादासाहेब खोगरे**

डॉ. कदम म्हणाले, शेती क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञान विकसित होत आहे हे विकसित तंत्रज्ञान पोहोचवण्यामध्ये कृषी उद्योजकांचा सहभाग हा महत्वाचा असणार आहे. शेतकऱ्यांना विविध सेवा सुविधा उपलब्ध करून देत असताना शेतकऱ्यांना जास्तीचा नफा कसा मि ळेल, यासाठी कृषी उद्योजकांनी प्रयत्न करावा.

संस्थेचे अध्यक्ष आणि ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यम तून प्रवरेचा विद्यार्थी हा नोकरी करणारा नव्हे तर नोकरी देणारा व्हावा यासाठी प्रयत सुरू आहेत. आज राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध योजना शेतकऱ्यांसाठी सुरू आहेत या योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यामध्ये कृषी उद्योजकांचा वाटा महत्वपूर्ण ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

# संगमनेरात अतिक्रमण विरोधात मोहीम सुरुच

**जनता आवाज वृत्तसेवा**




**संगमनेर :** शहरातील अतिक्रम णांवर प्रशासनाची वक्रदृष्टी पडली असून त्याविरोधात गेल्या काही दिवसांपासून मोहीम सुरू केलेली आहे. त्यानुसार पोलीस बंदोबस्तात अनधिकृत पाच कत्तलखाने व दहा ते बारा गाळे जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केले आहे. यामुळे या परिसराने मोकळा श्वास घेतला आहे.

संगमनेर शहरात मोठ्या प्रम णात अतिक्रमण केल्याने अनेक समस्या निर्माण होत आहे. याची लोकप्रतिनिधींसह प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन अतिक्रमण विरोधात मोहीम उघडली आहे. यापूर्वी प्रशासनाने प्रवरा पूल ते वीज उपकेंद्रापर्यंत अतिक्रमणे काढली.

यामुळे जुन्या पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गाने मोकळा श्वास घेतला आहे. ही मोहीम पुढेही सुरूच राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितलेले होते. त्यादृष्टीने गुरुवारी देखील जोरदारपणे ही म ोहीम राबविण्यात आली.

गुरुवारी शहरातील जमजम कॉलनी येथील चार आणि नाटकी नाला येथील एक असे एकूण पाच अनधिकृत कत्तलखाने जेसीबीच्या साहाय्याने जमीनदोस्त केले. यानंतर अलका फ्रुट ते कुटे हॉस्पिटल रस्त्यालगत असलेले पक्के बांधकाम असलेले दहा ते बारा अतिक्रमणित गाळेही काढण्यात आले. यावेळी मोठी गर्दी झाली होती. पालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक आणि पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. याम ुळे तेथील परिसराने मोकळा श्वास घेतला आहे.

# राहाता बाजार समितीत हरभरा ५३६० रुपये क्विंटल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** राहाता बाजार समितीत हरभरा जास्तीत जास्त प्रतिक्विंटलला ५३६० रुपये भाव मिळाला. हरभरा ६ क्विंटलची आवक झाली. ५२६२ ते ५३६० रुपये तर सरासरी ५३२० रुपये भाव मिळाला. गव्हाच्या २९ क्विंटलची आवक झाली. गव्हाला २८०० ते २८६६ रुपये तर सरासरी २८४० रुपये भाव मिळाला. सोयाबीनची ५ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला ३८५१ ते ३९७० रुपये तर सरासरी ३९१० रुपये भाव मिळाला. संत्रीच्या ८ क्रेटसची आवक झाली. संत्रीला ७५० ते १५०० रुपये तर सरासरी ११२५ प्रतिक्विंटलला भाव मिळाला. कोल्हार उपबाजारात सोयाबीनची ५ क्विंटलची आवक झाली. सोयाबीनला ४००० ते ४०४१ रुपये तर सरासरी ४००५ रुपये भाव मिळाला. गव्हाच्या ९ क्विंटलची आवक झाली. गव्हाला २७५१ रुपये ते ३०९९ रुपये भाव मि ळाला तर सरासरी २९२५ रुपये भाव मिळाला. हरभरा २ क्विंटलची आवक झाली. हरभरा सरासरी ५३५५ रुपये भाव मिळाला. उडीद सरासरी ५१९९ रुपये भाव मिळाला. तुरीला (लाल) सरासरी ६६९९ रुपये प्रतिक्विंटलला भाव मिळाल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# शिवपुतळ्यासाठी 'छावा'चे बोंबाबोंब आंदोलन




**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** शहरात छत्रपती शिवाजी महाराजांच्यापुतळ्या संदर्भात पालिकेकडून होणारी टाळाटाळ दिरंगाईमुळे बोंबाबोंब आंदोलन करून पालिका प्रशासनाच्या नावाने बोंबा मारण्यात आल्या. यापूर्वीही संघटनेच्या वतीने विविध प्रकारची आंदोलने करण्यात येवूनही पालिका याबाबत कार्यवाही करत नाही. श्रीरामपूर शहरातील गेल्या अनेक वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचा प्रश्न प्रलंबित असून, पुतळा खरेदी होऊन त्याच गोडाऊन भाड्याची रक्कम पुतळ्याच्या किमती इतकी झाली असेल भूमि पूजनही झाले परंतू आजपर्यंत, शिवाजीमहाराज यांचा पुतळा होत नाही.

अखिलभारतीय छावा मराठा युवा संघटनेने गेली अनेक वर्षे शिवजयंतीदिनी नगर पालिकेवर, घंटा नाद, हरीभजन, उपोषणअसे अनेक आंदोलने केलेली आहे. त्यावेळी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता आजही झालेली नाही.आंदोलनात छावाचे प्रदेश संघटक सुभाष जंगले, जिल्हाध्यक्ष नितीन पटारे, दादा बडाख, विजय बडाख, प्रशांत पटारे, प्रवीण देवकर, अक्षय पटारे, दुर्गेश गडकर, गोरख शेजुळ, सुभाष मोरे, तुषार थोरात, निलेश बनकर, राजेंद्र भिंगारे, राजेंद्र सोनवणे, अनिल लबडे आदी छावा सैनिक उपस्थित होते.



# आज श्रीरामपूर बंदची हाक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** अतिक्रमाणांमध्ये काढलेल्या दुकानदारांचे पुनर्वसन करावे तसेच तात्पुरत्या स्वरूपात पोट भरण्यासाठी पाच फुटाची जागा द्यावी. अतिक्रमणाची मर्यादा ठरून मार्किंग करून द्यावी, या मागणीसाठी गांधी पुतळा या ठिकाणी आमरण उपोषणास बसलेल्या व्यापाऱ्यांची प्रकृती खालवल्यामुळे त्यांना पाठिंबा देण्यासाठी श्रीरामपूरातील सर्व छोट्या मोठ्या व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आज श्रीरामपूर बंद ठेवून अडचणीत सापडलेले व्यापारी बांधवांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी आज सकाळी ११ वाजता गांधी पुतळा या ठिकाणी श्रीरामपुरातील सर्व व्यापारी तसेच पक्ष संघटनाच्या कार्यकर्ते नेत्यांनी उपस्थित राहावे, असे आव्हान श्रीरामपूर दुकानदार पुनर्वसन समि तीच्या वतीने करण्यात येत आहे

# अपघातात निखिल कासलीवाल यांचे निधन



**श्रीरामपूर :** येथील खते व बी-बियाणांचे तरुण व्यापारी निखिल संजय कासलीवाल (वय २५) हे शुक'वारी एका अपघातात जखमी झाले होते. येथे अनारसे हॉस्पिटलमध्ये श्रीरामपूरला प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारानंतर नगर येथील मॅक्स केअर हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले होते. उपचारा दरम्यान शनिवारी दुपारी त्यांचे निधन झाले आहे.अपघाताची घटना घडली की, निखिल कासलीवाल हे दि. २१ रोजी सायंकाळी ७.३० च्या सुमारास बलेनो कार नं. एम. एच. १७, ए. झेड. ७३४४ या गाडीमध्ये पाठीमागील सिटवर बसलेले होते. पुणतांब्याहून श्रीरामपूरकडे येत असतांना कार चालकास रेल्वे बोगद्याचा अंदाज न लागल्यामुळे कार डाव्या बाजुने बोगद्याला धडकून घासली असता कारच्या मागील दरवाजा उघडला गेला. मागे बसलेले निखिल कासलीवाल हे कार मधून खाली पडले व त्यांच्या डोक्यास गंभीर मार लागून जखमी झाले. नगर येथे हॉस्पिटलमध्ये उपचारा दरम्यान त्यांची शनिवारी दुपारी ३ वाजता प्राणज्योत मावळली. स्व. निखिल कासलीवाल हे संजय शोभाचंद कासलीवाल यांचे चिरंजीव, तसेच कैलास, विलास कासलीवाल व जितेंद्र कासलीवाल यांचे पुतणे व नवीन, केतन, वीर, सिद्धांत यांचे बंधु होते.

# संजीवनी इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये तांत्रिक प्रदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** सर्जनशीलता, उद्यमशीलता, चिकाटी, नावीन्यता, विज्ञानवादी दृष्टिकोन, अशा अनेक व्यक्तिमत्वांची कोंदणे विकसित करण्यासाठी संजीवनी इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये अनेक उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना आकार देण्याचे काम केले जाते. या अनुषंगाने संजीवनी विद्यार्थी विकास कक्षाने सर्व इतर विभागांच्या मदतीने टेक संजीवनी २०२५ या भव्य तांत्रिक प्रदर्शन व सादरीकरणाचे आयोजन केले होते. यात संजीवनीसह इतर महाविद्यालयांतील इंजिनीअरिंग,



पॉलिटेक्निक, एमबीए, कॉमर्स, सायन्स, बीबीएच्या सुमारे १००० पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवून आपली प्रतिभासंपन्नता व वैज्ञानिक विचारांची झेप अजमावली.

यावेळी चीफ टेक्निकल ऑफिसर विजय नायडू, डायरेक्टर डॉ. ए. जी. ठाकूर, सर्व विभाग प्रमुख, सर्व डीन्स, विद्यार्थी विकास कक्षाचे मुख्य समन्वयक डॉ. मकरंद कुलकर्णी व उपसमन्वयक प्रा. के. डी. पेटारे, आदी उपस्थित होते. यात विविध तांत्रिक प्रदर्शने व त्यांच्या सादरीकरणाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. सर्व बाबींचे नियोजन हे शिक्षकांच्या मार्गदर्शनखाली विद्यार्थ्यांनीच केले. संजीवनी ग्रुप ऑफ इन्स्टट्यूट्सचे मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी उत्कृष्ट नियोजनाबाबत व विद्यार्थ्यांच्या सर्जनशील प्रकल्पांबाबत त्यांचे अभिनंदन केले.

### मान्यवरांच्या उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन

नाशिक येथील इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशनचे प्रेसिडेंट ललीत बुब, इंडस्ट्री इर्नस्टटयूट कमिटीचे चेअरमन अलोक कनाणी, सुपर टेक इंडस्ट्रीजचे डायरेक्टर रणजित सानप, उद्योजक व संजीवनीचे म ाजी विद्यार्थी राहुल गांगुर्डे यांच्या हस्ते व संजीवनीचे अध्यक्ष नितीन कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली संजीवनी फेस्ट या भव्य प्रदर्शनाचे व स्पर्धेचे उद्घाटन झाले.

# ट्रॅक्टर ट्रॉलीला अपघात; ८ जखमी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** तालुक्यातील माणिकदौंडी घाटातील केळवंडी शिवारात ऊस तोडणी कामगाराच्या ट्रॅक्टर ट्रॉलीला अपघात होऊन आठ कामगार जखमी झाले आहे.जखमींमध्ये सहा गंभीर जखमी असून तीन जणांची प्रकृती चिंताजनक असून सहा जणांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलवण्यात आले.सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर साखर कारखानाहून हे ऊस तोडणी कामगार परतीच्या प्रवासा दरम्यान आपल्या गावी येत होते. शनिवारी

(ता.२२) दुपारी चार वाजण्याच्या सुमारास ऊस तोडणी कामगाराचा ट्रॅक्टर ट्रॉली घाटातील केळवंडी शिवारात धोकादायक वळणावर ताबा सुटून पलटला. या कामगाराचे स्वतःच्या गावाच्या शिवारात घडली आहे.ट्रॅक्टरचे ब्रेक नादुरुस्त झाल्याने ट्रॅक्टरचा ड्रायव्हर अंबादास सदाशिव खोत याने ट्रॅक्टर झाडावर जाऊन आदळण्याचा प्रयत्न केला.मात्र त्यापूर्वीच ट्रॅक्टरच्या ट्रॉल्या पलटल्या गेल्या.या जखमींमध्ये महिला आणि पुरुषांचा समावेश आहे. अपघातानंतर ट्रॉलीमध्ये असलेले संसार उपयोगी सामान आणि कामगार रस्तावर पडले गेले. अपघाताची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शक पोलीस उपनिरीक्षक लक्ष्मण पवार, राजेंद्र म्हस्के, अक्षय वडते,पंचायत समितीचे माजी सभापती सुनील ओव्हळ,अँड. आर एन शेटे यांच्यासह स्थानिकांच्या मदतीने अपघातस्थळावर जखमींना उपचारासाठी मदत कार्य केले.

# संगणक अभियांत्रिकीत विद्यार्थ्यांना करिअरची संधी -कुंदन धांडे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**लोणी :** संगणक अभियांत्रिकीम ध्ये विद्यार्थ्यांना मोठी करिअर संधी उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच प्रत्यक्ष कृतीतूनही शिक्षण घ्यावे, यासाठी प्रवरा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या माध्यमातून दिले जाणाऱ्या शिक्षणातून विद्यार्थ्यांना प्लेसमेंट आणि स्वंयरोजगारांसाठी मदत होत असून प्रवरेचा माझी विद्यार्थी हा प्रवरेसाठी नेहमीच कार्यतत्पर राहील, अशी ग्वाही कुंदन धांडे (ग्लोबंट इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पुणे) यांनी केले.

लोणी येथे प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभागाच्या माजी विद्यार्थी संवाद सत्रामध्ये ते बोलत होते. या सत्रामध्ये मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये उच्च पदांवर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला आणि त्यांच्या अनुभवांची मोलाची शिकवण दिली.

या कार्यक्रमासाठी डॉयचे बँकचे असिस्टंट व्हाइस प्रेसिडेंट सुजीत फुलसे, सोल्यूशन्स इंजिनीयर, सविअंट कन्सल्टिंग, पुणेचे योगेश चौधरी, मेंबर ऑफ टेक्निकल स्टाफ, टिल्डा रिसर्च, यूएसएचे मुकेश शिंदे आणि अक्सेंचर असिस्टंट मॅनेजर भुषण महाजन, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुष्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, विभाग प्रमुख डॉ. मिनिनाथ बेंद्रे उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी केली विविध विषयांवर चर्चा

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारले आणि इंडस्ट्रीत यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या ट्रेंड्स, स्किल सेट्स आणि प्लेसमेंट रणनीतींची माहिती घेतली. तसेच, अध्यापकवर्गानेही शिक्षण आणि उद्योग यातील दरी कशी भरून काढता येईल यावर चर्चा केली.

# विधवा महिलेचा पुर्नविवाह थाटामाटात संपन्न!

## चुलतीच्या विवाहासाठी पुतण्या गौरव तनपुरेंचा पुढाकार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** समाजात विधवा पुर्नविवाहाला अजूनही संकोचाने पाहिले जाते. अनेक विधवा म हिलांना आपले उर्वरित आयुष्य एकाकीपणात आणि संघर्षात घालवावे लागते. मात्र सामाजिक परिवर्तन आणि समतावादी दृष्टिकोन अंगीकारत गौरव तनपुरे यांनी आपल्या विधवा चुलतींच्या विवाहाचा पुढाकार घेत समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.



गौरव तनपुरे यांच्या चुलते बाळकृष्ण सखाराम तनपुरे यांचे २०२१ मध्ये निधन झाले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नीचे जीवन एकाकी झाले. त्यांचा मुलगा गतिमंद असल्याने जबाबदारीही वाढली होती. अशा परिस्थितीत पुर्नविवाह हा केवळ मानसिक आधार नव्हे, तर सामाजिक आणि भावनिक स्थैर्यासाठीही आवश्यक होता. हे लक्षात घेऊन गौरव तनपुरे यांनी आपल्या चुलतींसाठी योग्य जोडीदार शोधण्याचा निर्णय घेतला आणि नुकताच त्यांचा विवाह सोहळा थाटामाटात पार पडला.

विधवा स्त्रियांना अनेकदा म ानसिकदृष्ट्या एकटे पडावे लागते. त्यांना घरामध्येही दुय्यम स्थान दिले जाते. अनेक विधवा स्त्रिया आर्थिकदृष्ट्या सक्षम नसतात. पतीच्या निधनानंतर घरखर्चाचा भार त्यांच्यावर येतो आणि नोकरी किंवा व्यवसायाची संधी नसल्याने त्यांना मोठ्या संकटांचा सामना करावा लागतो.

सामाजिक निर्बंध: विधवा स्त्रियांनी पारंपरिक जीवनशैलीचे पालन करावे, त्यांना पुन्हा संसाराची संधी देऊ नये, असा चुकीचा समज समाजात आहे. त्यामुळे त्यांचे पुनर्विवाह होणे कठीण होते.यामुळेच विवाह ही केवळ सामाजिक परंपरा नसून एकमेकांना भावनिक आणि मानसिक स्थैर्य देणारी संस्था आहे.

### गौरव तनपुरे यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद

गौरव तनपुरे यांनी समाजसेवेचा वसा घेतला आहे. त्यांनी अनेक रुग्णांना मदत केली आहे. आजपर्यंत मुख्यमंत्री सहायता निधी आणि महात्मा फुले आरोग्य योजनेच्या माध्यमातून ६८ लाखांहून अधिक मदत रुग्णांसाठी मिळवून दिली आहे. रुग्णसेवा: अनेक रुग्णांना मुंबईत नेऊन त्यांची मोठी ऑपरेशन्स करून आणली आहेत. कृष्ठरोग्यांना नागपूर येथे उपचारासाठी नेण्याचे कार्य केले आहे.अपंग आणि अनाथांसाठी मदत: अपंग व अनाथ मुलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

विधवा पुनर्विवाह ही समाजाची जबाबदारी आहे. एकट्या व्यक्तींना योग्य जीवनसाथी मिळावा, यासाठी प्रत्येकाने पुढाकार घेतला पाहिजे. समाजाच्या सकारात्मक बदलासाठी मी सदैव तत्पर आहे आणि यापुढेही असेच कार्य करत राहीन.

**-गौरव विठ्ठल तनपुरे, सामाजिक कार्यकर्ते**

# मी कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार : माजी आ. तनपुरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तिसगाव** : विधानसभेत माझा पराभव झाला असला तरी मी खचलो नाही आणि कार्यकर्त्यांनीही अजिबात खचून जाऊ नये. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच नगरपरिषद निवडणुकांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता स्थापन करण्यासाठी कार्यकर्त्यांच्या मागे खंबीरपणे उभा राहणार असल्याचेही प्रतिपादन माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी केले.

पाथर्डी तालुक्यातील शिराळ येथे नव्याने उभारण्यात आलेल्या विज उपकेंद्राच्या लोकार्पण करण्यात आले. यावेळी माजी आ. तनपुरे बोलत होते.

यावेळी ज्येष्ठ नेते झिने, बाबासाहेब भिटे, युवानेते अमोल वाघ, अंबादास डमाळे, चेअरमन पोपटराव आव्हाड, संतोष गरुड, जालिंदर वामन, सरपंच भीमराज सोनवणे, सरपंच राजेंद्र पाठक, विलास टेमकर, कुंडलीक मचे, सुनील लवांडे, वैभव गीते, माजी सरपंच शिवाजी घोरपडे, रामदास गोरे, किसन दारकुंडे, अमोल वाघ, सुनील तुपे, सरपंच रवींद्र मुळे, डॉ. शिवाजीराव घोरपडे यांच्यासह विविध गावातील सरपंच उपसरपंच चेअरमन चेअरमन शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.



> मी आमदार असताना पाच वर्षे या भागाला मुबलक पाणी मिळाले. परंतु, आता या भागातील शेतकऱ्यांना पाण्यासाठी मोठी धडपड करावी लागते याची कुठेतरी मनाला खंत आहे. वांबोरी चारीला पाणी मिळाले नाही, तर वेळ प्रसंगी पांढरीचापूल या ठिकाणी शेतकऱ्यांसाठी रस्तारोको करणार आहे.
>
> **– प्राजक्त तनपुरे, माजी आमदार**

# हरीत शपथ घेण्याच्या घटका मनपा अव्वल

## यावर्षीच्या अभियानात पहिल्या क्रमांकाचे उद्दिष्ट, नागरिकांनी सहभागी व्हावे :आयुक्त डांगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : माझी वसुंधरा अभियान ५.० अंतर्गत दुसऱ्या तिमाहीमध्ये (ऑक्टोबर ते डिसेंबर २०२४) हरित शपथ घटकात अहिल्यानगर महानगरपालिका राज्यात तीन ते दहा लाख लोकसंख्येच्या गटात पहिल्या क्रमांकावर आली आहे. शहरातील १,४८,८९५ नागरिकांनी वैयक्तिक तर २००२ ग्रुपने सामूहिकरित्या हरीत शपथ घेतली.

माझी वसुंधरा अभियानात अहिल्यानगरमहानगरपालिकेने यापूर्वी दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले आहे. आता प्रथम क्रमांक मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सर्व नागरिकांनी या अभियानामध्ये सहभागी होऊन सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.



आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या पुढाकारातून यापूर्वी शहरात सुशोभीकरण व वृक्षारोपण अभियान मोठ्या प्रमाणात राबविण्यात आले होते. आजही वृक्षारोपण मोठ्या प्रमाणात होत आहे. नव्याने शहरात उद्याने व हरित क्षेत्र तयार करण्यात येत आहे.

सौर ऊर्जेच्या वापराबाबत, इलेक्ट्रिक वाहन वापराबाबत नागरिकांमध्ये जनजागृती केली जात आहे. रेन वॉटर हार्वेस्टिंगबाबत नागरिकांना घरोघरी जाऊन माहिती देण्यात येत आहे. प्रशासकीय इमारतींवर रेन वॉटर हार्वे स्टिंग करण्यात येत आहे. अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून अहिल्यानगर शहर सुंदर व हरित शहर करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

मागील काळात अहिल्यानगरमहानगरपालिकेने माझी वसुंधरा अभियान २.० मध्ये १.५० कोटी, ३.० मध्ये ६.०० कोटी व ४.० मध्ये ६.०० कोटी अशी एकूण १३.५० कोटी रुपयांची पारितोषिके मिळवली आहेत. या रकमेतून शहरात विविध उद्याने, हरित क्षेत्र, सौर ऊर्जेचे प्रकल्प, वृक्षारोपण तसेच जनजागृतीपर उपक्रमांसाठी या निधीचा वापर करण्यात आला आहे. येत्या अभियानात पहिल्या क्रमांकाच्या पारितोषिकाचे उद्दिष्ट महानगरपालिकेने ठेवले आहे. त्यातील हरित शपथ घेण्याच्या घटकात पहिल्या स्थानावर झेप घेतली आहे. आता इतर घटकांतही नागरिकांच्या सहकार्यातून चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. याला साथ देऊन नगरकरांनी अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

# ‘साई निर्माण’ कॉलेजमध्ये शिवजयंती उत्साहात

## शिवचरित्र वाचताना जीवन मूल्यांचे दालन समृद्ध बनते : प्रफुल्ल खपके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : साई निर्माण एज्युकेशन हबचे साई निर्माण इंग्लिश मीडियम स्कूल व साई निर्माण ज्युनियर कॉलेज, शिर्डी येथे शिवजयंती उत्साहात संपन्न झाली.

यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास भालेकर यांनी सांभाळले, कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान चापेकर सरांनी स्वीकारले, समवेत युवा व्याख्याते प्रफुल्ल खपके, पत्रकार तुशार महाजन, मुख्याध्यापक गणेश डांगे व संदीप डांगे, अरबाज पठाण, शुभम शेलार आदि मान्यवर उपस्तीत होते.

शिवजयंतीनिमित्त अशाप्रकारे बौद्धिक कार्यक्रमांचे



आयोजन हा विद्यार्थ्यांसाठी दर्शदायी, चारित्र्यसंपन्नता व जीवन मूल्यांचा पाठ घालून देणारा उपक्रम आहे. स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व मासाहेब जिजाऊ यांनी शिवबांना बालपणापासूनच मातृत्वाचे, आदर्शाचे, शूर-वीर पराक्रमाचे धडे दिले. चांगले चांगले सवंगडी सोबतीला दिले म्हणून पुढे हिंदवी स्वराज्य साकार झाले. छत्रपती शिवरायांचे सूक्ष्म नियोजन, गनिमी कावा, युद्धतंत्र या सर्व असामान्य गुण कौशल्यांचा अभ्यास करून अनेक युरोपीय राष्ट्र आदर्श घेतात. यामध्ये अमेरिकेसारख्या महाबलाढ्य शक्तीला आपल्यासमोर नमवणारा व्हिएतनाम सारखा देश महाराजांच्या गनिमी कावा या युद्धतंत्राचा आदर्श घेऊन लढला, छत्रसाल बुंदेला महाराजांचा आदर्श घेऊन बुंदेलखंड हे आपलं राज्य स्वातंत्र्य करून घेतो, असे अनेक उदाहरणे खपके यांनी दिली.

> विद्यार्थ्यांना इतिहासातील ध्येयवाद, दूरदृष्टीकोण, सूक्ष्म अभ्यास-नियोजन, जिद्द-चिकाटी या गोष्टी भविष्याच्या वाटचालीसाठी गरजेच्या आहेत.
>
> **-ज्ञानेश्वर चौधरी**

स्वराज्यामध्ये स्त्री ही मराठ्यांच्या घरातील देव्हार्यामधील देवता समान, अर्थात पर स्त्री ही मातेसमान आहे अशी शिकवण होती. इथली रयत ही शेतकरी आहे आणि शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लागता कामा नये असे सैन्याला दिलेले सक्त आदेश महाराजांचे शेतकरी धोरण दर्शवते.महाराजांना त्यावेळेस समजले होते सैन्य हे पोटावरती चालतं पोट भरलेली असली की पाठीचा कणा टाईट राहतो आणि कुठलीही असामान्य लढाई सहज लढता येते. असे स्वराज्याचे विविध पैलू विद्यार्थ्यांसमोर मांडण्याचे काम प्रफुल्ल खपके यांनी केली. कार्यक्रमाचे आभार ज्ञानेश्वर चौधरी यांनी केले.

# एकविराकडून महिला टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा : डॉ. थोरात यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील महिला व युवतींच्या सबलीकरणाकरता एकविरा फाउंडेशनच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. आठ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त ६ मार्च ते १० मार्च २०२५ या काळात भव्य महिला टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा व रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती एकविरा फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. जयश्री थोरात यांनी दिली आहे.



जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित विविध कार्यक्रमांच्या बाबत अधिक माहिती देताना युवक काँग्रेसच्या अध्यक्ष डॉ. थोरात म्हणाल्या की, सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे मागील तीन वर्षापासून महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचे भव्य क्रिकेट सामने झाले आहेत. यामध्ये तालुक्यातील अनेक महिला भगिनींनी सहभाग घेतला आहे. यामुळे ही स्पर्धा राज्य पातळीवर पोहोचली आहे. सध्या देशामध्ये महिलांची आयपीएल सुरू असून ती मोठी लोकप्रिय झाली आहे.या स्पर्धेचे उद्घाटन ६ मार्च २०२५ रोजी सकाळी दहा वाजता बाळासाहेब थोरात माजी आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, आयोजक डॉ. जयश्री थोरात यांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे. सर्व सामन्यांसाठी प्रवेश विनामूल्य असून या स्पर्धांमधून जास्तीत जास्त संघांनी आपला सहभाग नोंदवावा . प्रवेश व संपर्कासाठी महिला व युवतींनी ७०५७०३७०३७ या क्रमांकावर अथवा यशोधन कार्यालय येथे संपर्क साधावा. असे आवाहन एकविरा फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

# डॉ. ठाकुरां यांची संजीवनीचे पहिले व्हाईस चांसलरपदी वर्णी

**समर्पण, नेतृत्व आणि संस्थेच्या दुरदृष्टीची डॉ. ठाकुर यांना पावती**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव** : संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजमध्ये सन १९८९ पासुन डॉ. ए. जी. ठाकुर यांनी लेक्चरर, प्राद्यापक, मेकॅनिकल इंजिनिअरींग विभागाचे विभाग प्रमुख, वसतिगृहांचे चिफ वार्डन ते संजीवनी इंजिअरींग कॉलेज या ऑटोनॉमस संस्थेचे डायरेक्टर पदे भुषविली. त्यांच्या कामातील समर्पण, त्यांच्यातील नेतृत्व गुण आणि त्यांच्याकडून विद्यार्थी व संस्थेच्या उज्वल भविष्यासाठी राबविण्यात येणारे उपक्रम, इत्यादी बाबींमुळे डॉ. ठाकुर यांनी शैक्षणिक जगतात एक आगळी वेगळी निर्माण केली.



संजीवनी शैक्षणिक संकुलाने वेगवेवेगळ्या क्षेत्रात दर्जा आणि गुणवत्तेच्या जोरावर देश परदेशात नवनवीन कीर्तिमान स्थापित केले. आता मागील वर्षापासून संजीवनी युनिव्हर्सिटी या स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना करून जणु काही ग्रामिण मुळापासुन ते जागतिक अंकुरापर्यंतचा प्रवास केला आहे.

डॉ. ठाकुर यांची प्रदिर्ध सेवा आणि कार्य करण्याच्या हातोटीने निवड मंडळाने त्यांची संजीवनी युनिव्हर्सिटीच्या पहिल्या संस्थापक व्हाईस चांसलर पदावर निवड केल्याची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत सुत्रांनी पसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.संजीवनी विद्यापीठाचे चेअरमन नितिन कोल्हे यांनी ठाकुर यांचा व्हाईस चांसलरपदी निवड झाल्याबध्दल अभिनंदन केले. तसेच विद्यापीठाचे प्रसिडेंट अमित कोल्हे यांनी डॉ. ठाकुर याचा सत्कार करून भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी संजीवनी सल्लागार मंडळाचे सदस्य डॉ. शांतम शुक्ला व चिफ टेक्निकल हेड विजय नायडू उपस्थित होते. संजीवनी विद्यापीठाने‘रूरल टू ग्लोबल’ नावलौकिक मिळविण्याचा विश्वास दाखविला आहे. त्यासाठी सुरूवातीपासुनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी देश परदेशातून उच्च दर्जाच्या प्राद्यापकांची नेमणुक येथे केली आहे. निवड मंडळाने डॉ.ठाकुर यांची संजीवणी विद्यापीठाच्या ‘व्हाईस चांसलर’ पदावर निवड केल्याने रूरल टू ग्लोबल हा विश्वास सार्थ ठरेल, असे मत व्यक्त केल्या जात आहे.

# ...खबरदार लक्ष्मण रेषा ओलांडली तर

## कर्जत पोलीस ॲक्शन मोडवर; वाहतुकीस अडथळा करणाऱ्या वाहनांवर कारवाई करणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : शहरातील मेन रोड हा अतिशय मोठ्या प्रमाणामध्ये वाहतुकीचा आणि वर्दळीचा आहे. हलके आणि अवजड वाहने या रस्त्याने मोठ्या प्रमाणामध्ये ये जा करत असतात. या रस्त्यावर कोंडी होऊ नये यासाठी कर्जत पोलीस क्शन मोडवर आले.

या मेन रोडच्या दोन्ही बाजूला पांढरी पट्टी पोलिसांनी मारली असून त्या रेषेच्या आतमध्ये सर्वांनी आपल्या दुचाकी किंवा चार चाकी वाहन लावावे. जर त्या रेषेच्या बाहेर वाहन उभा केले तर कारवाई करण्यात येईल, असा इशारा पोलीस पथकाने दिला आहे.

कर्जत येथील पोलीस निरीक्षक दौलतराव जाधव



यांच्या मार्गदर्शनाखाली आज पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी रस्त्यावर फिरून बेशिस्त वाहन उभा करणारे वाहन चालक तसेच व्यापारी यांना सूचना दिल्या. यामध्ये होमगार्ड देखील सहभागी झाले होते.

कर्जत शहरातील मेन रोडवर दिवसा व रात्री उशिरापर्यंत मोठ्या प्रमाणामध्ये वाहतूक सुरू असते. याशिवाय शाळांमध्ये जाणारे विद्यार्थी विद्यार्थिनी व पायी जाणारे नागरिक यांची संख्या देखील मोठी आहे.

हा रस्ता ओलांडताना प्रचंड वाहतुकीमुळे मोठी कसरत करावी लागते. त्यातच भरधाव जाणारे वाहने यामुळे अपघात देखील होत आहे. सोमवारी आठवडे बाजारच्या दिवशी तर या रस्त्यावर मोठी गर्दी होत असल्यामुळे सतत कोंडी होते. आणि याकडे पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष झाले होते. व्यापारी आघाडीच्या वतीने पोलिसांना निवेदन देऊन रस्त्यावर कोंडी होणार नाही यासाठी पुढाकार घ्यावा अशी विनंती देखील करण्यात आली होती.

### शिस्तप्रिय कर्जतकर बेशिस्त झाले

पोलीस प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे खाकीचा धाक संपला व शिस्तप्रिय असणारे कर्जतकर बेशिस्त झाले. अनेक तथाकथित नेत्यांच्या गाड्या रस्त्याच्या कडेला दिवसभर उभा राहिलेल्या दिसून येतात. मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. हे पाहून इतरांची देखील चांगलीच धाडस वाढले आणि आता कोणीही कर्जत शहरांमध्ये मेन रोडवर रस्त्यावरच गाडी पार्किंग करताना दिसून येते.

### रस्त्यावर मोकाट वाहने उभी

कर्ज शहरातील मेन रोडवर प्रचंड मोठ्या संख्येने अनेक जण रस्त्यावर मोकाट वाहन उभे करून निघून जातात. यामुळे वाहतुकीची कोंडी होते. आता हळूहळू सर्व वाहने पुन्हा एकदा रस्त्यावर उभी राहू लागली. त्याचा परिणाम एवढा मोठा रस्ता असूनही त्याची कोंडी होऊ लागली. मात्र पोलीस प्रशासनाने याकडे कोणतेही लक्ष दिले नाही.

# राष्ट्रपतींनंतर भोजनेंचा आज मायभूमी अकोलेत सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : बायोगॅस प्रकल्प लाभार्थी शेतकरी रामचंद्र गणपत भोजने यांचा नुकताच नवी दिल्ली येथे देशाचे राष्ट्रपतींकडून सन्मान करण्यात आला. महाराष्ट्रातील अवघ्या दोन शेतकऱ्यांचा राष्ट्रपतींकडून सन्मान करण्यात आला. यात त्यांचा समावेश होता. राष्ट्रपतींच्या सन्मानानंतर रामचंद्र भोजने यांचा आपल्या मातृभूमीत अबीतखिंड येथे अबीतखिंड ग्रामस्थ व अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेच्या वतीने सन्मान सोहळा आज, दि. २३ फेब्रुवारी २०१५ रोजी सकाळी ९ ते १२ वाजता जि. प. प्राथमिक शाळा, अबितखिंड येथे हा सत्कार सोहळा आयोजित केला आहे.

# राहुरीतील अल्पवयीन मुलीचे अपहरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी शहर** : घरात एकटीच असलेल्या अल्पवयीन मुलीला अज्ञात तरुणाने फूस लावून पळवून नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील एका गावात दि. १८ फेब्रुवारी रोजी घडली आली. याप्रकरणी राहुरी पोलिस ठाण्यात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला.

पिडीत मुलीने राहुरी पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, दि. १८ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी ४ वाजे दरम्यान १७ वर्षे ९ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी घरात एकटीच होती. त्यावेळी अज्ञात तरुणाने तीला फुस लावुन पळवून नेले.

नातेवाईकांनी तीचा परिसरात शोध घेतला. मात्र ती कुठेही मिळुन आली नाही. यावेळी पिडीत मुलीच्या नातेवाईकाने राहुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# विस्थापितांना न्याय हीच खरी ससाणेंना श्रद्धांजली

## आ. हेमंत ओगले; स्व. ससाणे यांच्या स्मृतिपित्यर्थ ३० गरजवंत विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : स्व. जयंतराव ससाणे यांचा नगरसेवक ते आमदार आणि साईबाबा संस्थान व्यवस्थेचे सलग सात वर्ष अध्यक्ष असा हा प्रवास नक्कीच प्रेरणादायी असून आज देखील राज्यात स्व. ससाणे यांनी केलेल्या कार्याची ओळख आहे. त्याच पावलावर पाऊल टाकत आपण कार्य करणार असून सध्या प्रशासनाने केलेल्या कारवाईमुळे विस्थापित झालेल्यांना न्याय देण्यासाठी आपण सर्वोपतरी प्रयत्नशील असून हीच खरी श्रद्धांजली असे प्रतिपादन आ. हेमंत ओगले यांनी केले.

स्व. ससाणे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी अखंड हिंदुस्तानाचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्ताने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी गरजवंत ३० शालेय विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले.

आ. ओगले म्हणाले की, सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून स्व. ससाणे साहेबांनी समाजकारण व राजकारण केले आपल्या पदाच्या माध्यमातून मतदारसंघाचा सर्वांगीण विकास कसा साधता यासाठी त्यांनी कायम प्रयत्न केले असल्याचे म्हटले.

युवा नेते करण ससाणे म्हणाले की, कुठलाही राजकीय वारसा नसताना तसेच कोणत्याही मोठ्या संस्था नसताना केवळ आणि केवळ सहकाऱ्यांच्या पाठिंबामुळेच



स्वर्गीय ससाने साहेबांनी कार्य केले त्यांनी दाखवून दिलेल्या मार्गावर आम्ही काम करत असल्याचे म्हटले.

यावेळी संजय फंड, बाबासाहेब दिघे, सभापती सुधीर नवले, प्रमोद भोसले, अण्णासाहेब डावखर, अंजुमभाई शेख, श्रीनिवास बिहाणी, मुजफ्फर शेख, दिलीप नागरे, अशीष धनवटे, शामलिंग शिंदे, दिपाली ससाणे, राजेंद्र पाऊलबुद्धे, खंडेराव सदाफळ, राजू चक्रनारायण, विलास दाभाडे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समीन बागवान यांनी केले. तर आभार आशिष धनवटे यांनी मानले.

# नळ जोडणीचे नावाखाली नागरिकांकडून लूट

## आ.हेमंत ओगले यांच्या नगरपरिषद प्रशासनाला सूचना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर नगर परिषदेने हाती घेतलेल्या अमृत २ विस्तारित पाणीपुरवठा योजनेचा भुर्दंड सर्वसामान्य नागरिकांवर नको, आमदार हेमंत ओगले यांनी नगरपरिषद प्रशासनाला सूचना दिल्या आहेत. नुकतीच आमदार हेमंत ओगले आणि युवानेते करण ससाणे यांनी कॅनॉल कडेच्या व्यापाऱ्यांना जलसंपदा विभागाने दिलेल्या नोटीसांबाबत व्यापाऱ्यांसह नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकाऱ्यांची भेट घेतली. यावेळी जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्ष सचिन गुजर, काँग्रेस शहर अध्यक्ष अण्णासाहेब





डावखर, माजी नगरसेवक आशिष धनवटे उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी अतिक्रमण नोटिशीसह सध्या चालू असलेल्या अमृत दोन योजनेच्या नळ जोडणीसाठी पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी उपस्थित केल्या.

यावेळी आमदार ओगले म्हणाले की, सध्या श्रीरामपूर नगर परिषदेने १७८ कोटींची सुधारित पाणीपुरवठा योजनेचे काम हाती घेतलेले आहे. परंतु शहरातील नागरिकांना नव्याने नळ जोडणीच्या नावाखाली चार ते पाच हजार रुपयांची मागणी ठेकेदाराकडून होत असल्याचे निदर्शनास आले.

याबाबत आमदार ओगले यांनी मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांना सूचना दिले आहे की, यापुढे अशा तक्रारी येणार नाही याची दक्षता घ्या यावेळी मुख्याधिकारी घोलप म्हणाले की, नागरिकांनी ठेकेदार अथवा त्याने नेमलेल्या माणसांकडे कुठलेही रक्कम नळ जोडणीच्या नावाखाली देऊ नये, अशी कोणी मागणी केल्यास याबाबत तातडीने नगरपरिषदेकडे संपर्क करावा, जेणेकरून नागरिकांची फसवणूक होणार नाही असे आवाहन त्यांनी केले.

तसेच याबाबतच्या अनेक तक्रारी माजी उपनगराध्यक्ष करण ससाने यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये देखील संभ्रमाचे वातावरण असून मुख्य ठेकेदाराने नेमलेले काही ठेकेदार हे नव्याने टाकण्यात आलेल्या लाईनवरून नळ जोडणीसाठी सर्रास हजारो रुपयांची मागणी नागरिकांकडे करत आहे. एकीकडे करोडो रुपयांची योजना राबवायची आणि दुसरीकडे सर्वसामान्य नागरिकांकडून नळ जोडणीच्या नावाखाली हजारो रुपये वसूल करायचे हे कसे चालेल असा सवाल आमदार हेमंत ओगले आणि ससाणे यांनी मुख्याधिकाऱ्यांकडे उपस्थित केला.

# सायबर विश्वाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन देण्यात आले



**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : मुख्यमंत्री यांच्या शंभर दिवसांच्या उद्दिष्ट पूर्तीच्या अनुषंगाने आज राहुरी तालुक्यातील सुमारे ३२ शाळांमध्ये व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे उपविभागीय पोलीस अधिकारी बसवराज शिवपुजे यांनी गुड टच बॅड टच तसेच सायबर विश्वात वावरताना घ्यावयाची काळजी याबाबत तालुक्यातील सुमारे ३२ शाळांमधील ७५०० विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदर मार्गदर्शन हे राहुरी फॅक्टरी येथील प्रसाद ग्रामीण शिक्षण संस्था अंतर्गत बाळासाहेब वाणी शैक्षणिक संकुल गणेगाव मधून करण्यात आले त्यावेळी शाळेचे संचालक वाणी सर तसेच तालुका शिक्षणाधिकारी श्री तुंबारे साहेब व तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख, डॉ. बसवराज शिवपुजे पोलीस उपाधीक्षक श्रीरामपूर विभाग श्रीरामपूर, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे पोलीस ठाणे राहुरी, पोलीस हेड कॉन्स्टेबल अशोक शिंदे गोपनीय शाखा राहुरी हे कार्यक्रमाला उपस्थित होते तालुक्यातील ३२ शाळांनी ऑनलाईन सहभागी होत्या.

# अकोलकर हिची अभियंतापदी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : अहिल्यानगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यात करंजी येथील श्री.नवनाथ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी साक्षी दत्तात्रय अकोलकर हिची स्नायडर फ्रेंच बहुराष्ट्रीय इलेक्ट्रिक कंपनीमध्ये अभियंतापदी निवड झाली आहे. साक्षी हिने नुकतेच शासकीय तंत्रनिकेतन मधून तृतीय वर्ष मेकॅनिकल डिग्री पूर्ण करीत असतानाच कॅम्पस इंटरव्ह्यूमधून तिची स्नायडर फ्रेंच इलेक्ट्रिकल कंपनीमध्ये अभियंतापदी निवड झाली आहे. साक्षी हिने आपले शालेय शिक्षण नवनाथ विद्यालय करंजी येथे पूर्ण केले. त्यानंतर शासकीय तंत्रनिकेतन इथून तीन वर्षाचा डिप्लोमा पूर्ण करत असतानाच शेवटचे वर्षात तिची या कंपनीमध्ये निवड झाली. ग्रामीण भागातील विद्यार्थी सुद्धा चांगल्या गुणवत्तेच्या जोरावर उच्च पदावर नोकरी प्राप्त करू शकतात यातून हे सिद्ध झाले. साक्षीचे परिसरातून अभिनंदन होत आहे. त्याचप्रमाणे नवनाथ विद्यालयातील उपक्रमशील शिक्षक स्वप्निल लवांडे यांचे तिला मार्गदर्शन लाभले. त्यामुळे तिच्या जीवनात नेत्रदीपक यश मिळाले. या यशाबद्दल करंजी गावातील सर्व ग्रामस्थासह श्री.नवनाथ विद्यालयाचे प्राचार्य सोनटक्के सर,कवडीवाले मॅडम,पिंपळे सर,घोरपडे सर,चव्हाण सर,खोडके सर त्यांनी देखील तिचे अभिनंदन केले आहे.श्री.नवनाथ विद्यालयात तिचा नुकताच सत्कार करण्यात आला यावेळी शिक्षक-शिक्षकेत्तर उपस्थित होते.

# संत गजानन महाराज यांचा प्रकट दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील आश्वी खुर्द येथे संत गजानन महाराज यांचा १४७ वा प्रकटदिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी माजी सरपंच म्हाळू गायकवाड, संचालक डॉ. दिनकर गायकवाड, पांडुरंग गायकवाड, प्राध्यापक जगदीश मुसमाडे, गणेश भोसले, प्रदिप वाल्हेकर कैलास गायकवाड, मोहित गायकवाड, दिपक सोनवणे तसेच परीसरातील संत गजानन महाराज सेवेकरी उपस्थित होते. यावेळी



हभप सचिन महाराज गायकवाड म्हणाले, गजानन महाराज हे बालपणापासूनच तेजस्वी होते. त्यांनी श्रीकृष्णाच्या लिलाप्रमाणे अनेक लिला केल्यात. गजानन महाराज आणि साईबाबा हे स्वामी समर्थांचे शिष्य होते. साईबाबा योग पुरूष असून निरांका परमेश्वराचे साकार रूप होते. साईबाबा हे १८३८ च्या दरम्यान शिर्डीत आले तर संत गजानन महाराज हे शके १८०० म्हणजेच २३ फेब्रुवारी १८७८ रोजी शेगावात भक्तांच्या कल्याणासाठी आले असल्याच सांगितले. यावेळी अष्टविनायक तरूण मित्र मंडळाचे अध्यक्ष उमेश सालकर, आदिनाथ जाधव, देवीदास पवार, बाळासाहेब माने, शिवनाथ कदम, संतोष शेजुळ, किरण बिडवे यासह अष्टविनायक तरूण मित्र मंडळाचे कार्यकर्ते, बजरंग दल कार्यकर्ते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

माणसातुन संत ज्ञानेश्वर तसेच जगदगुरू तुकाराम यांना देवत्व मिळाले पण ते इतक्या सहजासहजी मिळाले नसुन त्यामागे संतांचा मोठा त्याग आहे. जिवनात त्यागाशिवाय काहीच मिळत नाही. तसेच या साधु- संताच्या जिवनामध्ये अहंकारालाही जागा नाही. कुटूंबामध्ये तसेच प्रपंचामध्ये फक्त मी पणाच चाललेला आहे. मी पणा अथवा मी केलेले हे भगवाताला प्रिय नाही. त्यामुळे परमार्थ करत असतांनी तो वर बघुन करायचा व संसार करता असतांना खाली बघून राहायचे.

**हभप सचिन महाराज गायकवाड**

# संत नरहरी महाराज यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : राहुरी तालुका सराफ संघटना, हिंदू समाजाच्या वतीने संत नरहरी महाराज मंदिर येथे संत नरहरी महाराज यांची ७३८ वी पुण्यतिथी साजरी करण्यात आली. याप्रसंगी मंगल स्नान, होमहवन, पूजा, महाआरती वैदिक कार्यक्रम घेण्यात आले. समाजाने सालाबादप्रमाणे संत शिरोमणी श्रीनरहरी महाराज यांचा पुण्यतिथी उत्सव धार्मिक वातावरणात साजरा करीत सोनार समाजाचे असलेले एकतेचे दर्शन सर्वत्र घडवले. समाजातील शिरीष बुऱ्हाडे आणि परिवार हे गेल्या २१ वर्षांपासून जयंती व पुण्यतिथीला प्रत्येकाला संत नरहरी महाराजांच्या प्रतिमेचा बॅचचे वाटप कुठल्याही प्रकारचा मोबदला न घेता करतात, त्यांच्याही कौतुक या वेळी करण्यात आले. कार्यक्रमप्रसंगी संजीव उदावंत, विजय घोडेगावकर, रविंद्र सोनार, रवींद्र उदावंत, बजरंग मैड, डॉ. संतोष उदावंत, डॉ. सिद्धार्थ उदावंत, महेश उदावंत, कृष्णा मैड, मनोज उदावंत, दादासाहेब घोडेगावकर, गोविंद दहिवाळकर, किरण ताराबादकर, सचिन डहाळे, संतोष नागरे, गणेश उदावंत, सागर उदावंत, विजय दहिवाळकर, विश्वास बुन्हाडे, योगेश उदावंत, सागर लोळगे, गोविंद मंडलिक, चंद्रकांत मयूर, दीपक चासकर, कैलास दहिवाळकर, संतोष डहाळे, प्रकाश दहिवाळकर, आदि मान्यवर उपस्थित होते.

# शिवजयंतीच्या निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन

## मराठा एकीकरण समितीच्यावतीने विविध कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मराठा बहुउद्देशिय संस्था संचलित मराठा एकीकरण समिती, जिजाऊंच्या लेकी समूह आयोजित शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने भरगच्च कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते.

सकाळी पांडुरंग लॉन्स येथे तहसीलदार नामदेव पाटील, पो. नि. संजय ठेंगे, मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे यांच्या हस्ते मोफत आरोग्य तपासणी शिबिर व रक्तदान शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या आरोग्य शिबिरात विठ्ठलराव विखे पाटील हॉस्पिटल विळद,



**कार्यक्रमासाठी सर्वपक्षीय आले एकत्र**

या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून डॉ. हरि मोरे (कृषी शास्त्रज्ञ), माजी नगराध्यक्ष उषाताई तनपुरे, रनरागिणी महिला मंच अध्यक्ष धनश्रीताई विखे पाटील, देवळाली प्रवराचे माजी नगराध्यक्ष सत्यजित कदम, उपअधीक्षक बसवराज शिवपुंजे, पो. नि. संजय ठेंगे, राहुरी मुख्याधिकारी ज्ञानेश्वर ठोंबरे, देवळाली विकास नवाळे, साई आदर्श मल्टीस्टेजचे अध्यक्ष शिवाजी कपाळे उपस्थित होते.

ग्रामीण रुग्णालयात राहुरी, लाईफ इन हॉस्पिटल, रोटरी ब्लड बँक राहुरी, टायकॉन चॅरेटेबल फौंडेशन यांनी सहभाग घेतला. यावेळी ज्येष्ठ नेते तान्हाजी धसाळ, धर्मवीर प्रतिष्ठानचे राजूभाऊ शेटे, पै. नितीन कल्हापुरे, डॉ. विक्रम खुरुद, मराठा संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र लांबे, शिवजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष जनार्दन म्हसे, कार्याध्यक्ष अशोक कदम उपस्थित होते.

आरोग्य शिबिरास आ. सुधीर तांबे यांनी भेट दिली. शिवजयंती निमित्त ५१ सदस्यांनी रक्तदान केले. सायंकाळी सुप्रसिद्ध अभिनेता रमेश परळीकर यांचा खेळ पैठणी हा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# केडगावला अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : केडगाव मधील उदयनराजे नगर येथे श्री विश्वेश्वर प्रतिष्ठानच्या वतीने महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर अखंड हरिनाम सप्ताह श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी शिवलिलामृत पारायण आणि तपपुर्ती सोहळ्याचे प्रारंभ झाले. २० ते २७ फेब्रुवारी पर्यंत चालणाऱ्या या धार्मिक सोहळ्याचे हे तेरावे वर्ष आहे. या सप्ताहाचे उद्घाटन उद्योजक सचिन (आबा) कोतकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी माजी नगरसेवक गणेश कवडे, इंजि. प्रसाद आंधळे, सचिन सातपुते, प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश सातपुते, भूषण गुंड, सागर सातपुते, अशोक कराळे, महेश घोडके, महेश महाराज मडके, हरिभक्त परायण जगन्नाथ महाराज जाधव, उद्योजक महेश वाळके, मुकुंद दळवी, सुनील उमाप, पोपट कराळे, भीमा सातपुते, ह.भ.प. बाळासाहेब मुंडे, ह.भ.प. मोकाटे, बाबुराव खोसे, गणेश भागवत, विठ्ठल साबळे, खेडकर मेजर, संजय खामकर, विशाल सकट, मच्छिंद्र भांबरे, स्वप्नील पवार, गोरक्षनाथ कोकाटे, योगेश डोंगरे, राजेंद्र कोल्हे, रोहित धांडे आदींसह परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते कलश पूजन, प्रतिमापूजन व तुलसी पूजन पार पडले. प्रास्ताविकात गणेश सातपुते म्हणाले की, समाजात व भावी पिढीत संस्कार रुजवण्यासाठी आणि आपल्या धर्माचे ज्ञान देण्यासाठी या सप्ताहाचे आयोजन दरवर्षी केले जाते. धर्म व परमार्थातून यशस्वी जीवनाची वाटचाल करता येणार आहे. यासाठी सर्वांना या धार्मिक सोहळ्यातून जोडले जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# प्रवरा शिक्षणशास्त्र महाविद्यालयास ‘बी प्लस’ श्रेणी मानांकन

## प्राचार्या वाजे यांची माहिती; ग्रामीण पातळीवरील दोन वेळा नॅक पुनर्मूल्यांकन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : दर्जेदार शिक्षणासोबतच सुसंस्कारित आदर्श नागरिक आणि कौशल्यपूर्ण शिक्षक घडविण्यात प्रवरा शैक्षणिक संकुल हे अव्वल स्थानावर आहे. शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच विद्यार्थ्यांचा सामाजिक उपक्रमातून सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकास घडविण्याचे आणि आदर्श आणि कौशल्यपूर्ण शिक्षक निर्माण करण्याचे कार्य १९९० पासून शिक्षणशास्त्र महाविद्यालयात करीत आलेले आहे. पुनर्मूल्यांकनासाठी प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालयास नॅकद्वारे बी प्लस दर्जा प्राप्त झाला आहे. हे महाविद्यालय ग्रामीण भागामध्ये



तंत्रस्नेही आणि कौशल्याधिष्ठित शिक्षक निर्मितीसाठी ओळखले जाते, अशी माहिती प्राचार्या डॉ. विद्या. पी वाजे यांनी दिली.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा ग्रामीण शिक्षणशास्त्र महाविद्यालयास राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद, बंगलोरच्या टिमने १२ व १३ फेब्रुवारी ला प्रत्यक्ष भेट देऊन महाविद्यालयातील अध्ययन व अध्यापन प्रक्रिया, भौतिक सुविधा, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी यांच्या प्रगती बरोबरच संशोधन, कौशल्य विकास अभ्यासक्रम, समाजाभिमुख उपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना, कमवा आणि शिका योजना आणि विद्यार्थी केंद्रीत विविध उपक्रमांचे नॅक समितीने तपासणी केली.

या महाविद्यालयात ग्रामीण भागातील २०० विद्यार्थी-विद्यार्थिनी पदवीसह पदव्युत्तर शिक्षण घेत आहेत. महाविद्यालयामध्ये पायाभूत सर्व सेवा-सुविधा उपलब्ध असून मुलीसाठी सुरक्षित कॅम्पस म्हणून प्रवरेची वेगळी ओळख आहे. नोंदणीकृत माजी विद्यार्थी संघ, उच्चविद्याविभूषित प्राध्यापक वृंद, सौर ऊर्जाचा वापर, पर्यावरण पूरक परिसर, प्लेसेमेट विभाग शिवाय मागासवर्गीय व सर्वसाधारण गटातील विद्यार्थ्यांना विविध शासकीय शिष्यवृत्ती योजना, गरीब विद्यार्थी सहाय्य निधी योजना, या सुविधा बरोबर अभ्यासपूरक उपक्रम, विद्यार्थी दत्तक पालकत्व योजना, दत्तक गाव योजना आदी योजना राबविल्या जातात.

महाविद्यालयाने १३ शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी सामंजस्य करार केलेले आहेत. तसेच राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय परिसंवाद, चर्चासत्र, कार्यशाळा आणि क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आलेले आहे. उत्कृष्ट निकालाची परंपरा, क्रीडांगण व सर्व प्रकारच्या क्रीडा साहित्याने परिपूर्ण हॉल या सर्वाची दखल घेत महाविद्यालयास बी प्लस दर्जा प्राप्त झाला आहे. महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी तसेच प्राचार्या, डॉ.विद्या पी. वाजे आणि नॅक व अंतर्गत गुणवत्ता हमी विभाग समन्वयक प्रा. राजू बी. मोरे आदींनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक विकासक्रमात मौलिक मार्गदर्शन केले.

# भगवंताचे नाम सर्वश्रेष्ठः अक्षय महाराज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**भातकुडगाव फाटा** : भगवंताचे नाम सर्वश्रेष्ठ आहे. नामाचा महिमा अगणित असून पौराणिक ग्रंथामध्येही भगवंतापेक्षाही भगवंताच्या नामामुळेच साध्यापर्यंत पोहोचता आले. याचे अनेक उदाहरणे आजही धर्म ग्रंथामधून पाहावयास मिळते. तोच नामाचा महिमा जगद्गुरु संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांनी जगाला उपदेश करताना नामाचा महिमा सांगितला आहे.

त्याचबरोबर वैज्ञानिक दृष्टिकोनही त्याकाळी महाराजांनी सांगून ठेवला आहे. त्यामुळेच भगवंताचे नाम सर्वश्रेष्ठ आहे, असे मत अक्षय महाराज उगले यांनी व्यक्त केले शेवगाव -नेवासा राजमार्गावरील भातकुडगाव येथे श्री. क्षेत्र स्वयंभू काळेश्वर देवस्थान गुंफा येथे सालाबाद महाशिवरात्री उत्सवानिमित्त दत्तपीठ देवगड संस्थानचे महंत शांतीब्रह्म भास्करगिरीजी महाराज यांच्या शुभ आशीर्वादाने व रामायणाचार्य प्रभाकर महाराज कावले तसेच मठाधिपती लहानू महाराज कराळे यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहमध्ये दुसऱ्या दिवशीचे पुष्प गुंफताना महाराज बोलत होते. हनुमंतरायांनी नामाच्या बळावरच प्रभू श्रीरामचंद्रांसमोर भक्तीमध्ये नाम श्रेष्ठ आहे हे सिद्ध करून दिले. अनेक साधुसंतांनी विविध ग्रंथांमध्ये ही नामस्मरण हेच विश्वाला भक्ती मार्गातून सिद्ध प्राप्तीकडे घेऊन जाऊ शकते, हेच दाखवून दिले आहे. जीवनात निरोगी आयुष्य जगायचे असल्यास नामजप हाच एकमेव पर्याय आहे. असेही मत महाराजांनी मांडले. यावेळी महेश महाराज काळे, भातकुडगावचे माजी सरपंच शंकरराव नारळकर, बाळासाहेब काळे, संजय आहेर, जालिंदर आहेर, भास्कर चोपडे, विठ्ठल चोरमारे, उपस्थित होते.



साध्या सरळ भाषेत श्रोत्यांसमोर विवेचन मांडताना नामाचा महिमा सांगून महाराजांनी सामाजिक जीवनातील अनेक दाखले दिले. सत्य घटनेवरील अनेक उदाहरणे देताना उपस्थित भाविकांच्या डोळ्याच्या कडा पानवल्या. स्वयंभू काळेश्वराच्या प्रांगणात चालू असलेला ज्ञानयज्ञ आपल्याला जीवनात खूप ऊर्जा देऊन जातो. असे उत्सव समाजाला दिशादर्शक ठरतात, असेही महाराजांनी विशद केले.

# पोदारच्या खेळाडूंचे मार्शल आर्ट बेल्ट परीक्षेत यश




**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर** : नगर शहरातील अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानच्या व दि इंडियन पावर मार्शलआर्ट असोसिएशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध बेल्ट परीक्षेमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट प्रदर्शन करीत घवघवीत यश संपादन केले. यल्लो बेल्टचे विजेते- वीरा गांधी, शुभ्रा जोशी, दृष्टी मुनोत, सिया निमसे, शाश्वती तांबे, अवनी कर्डीले, संजूकता पवार, गुफराणा पठाण, गार्गी फुलांबरकर, स्वरा गीते, गार्गी खेडकर, शरण्या बोरुडे, सानवी बाडे, जिया कटारिया, आराधना शेळके, निल साबळे, विराज निकम, प्रदनेश सिणारे, मयंक पठारे, शिवराज वाघ, दिशांत पठारे, शौर्य देठे, यशराज शेळके, दिव्यांश गायकवाड, श्रेयश भनगडे, श्रवण पवार, साई गडाक, सोहम गायकवाड, रुद्राक्ष खंडागळे, शिवाश पवार, स्वराज कासार, अर्चित बोराडे, शिवराज पाटील, स्वराज नागरगोजे, श्रुष्टी वाघ, सानवी गार्डे, विराज निलाखे. ऑरेंज बेल्टचे विजेते- खुशी मुनोत, सयुक्ता पगारे, नेत्रा साबळे, रिदम वाघमारे, शिवश्री म्हसे, सीयल मुनोत,अनवि पितळे,मीहीका आव्हाड,सानवी बांगर, आग्रता बकाली, आरुषी गायकवाड,अवनी मेहेर,कुंज गजेरा, जानवी बोबडे,अर्णव फलके,वरद भिसे,क्रीशिव गजेरा आदी सर्व खेळाडूंचे प्राचार्य मंगेश जगताप,उप प्राचार्य शगुप्ता काजी,आशुतोष नामदेव यांनी अभिनंदन केले. सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक राष्ट्रीयकोच महेश आनंदकर, सचिन पठारे, सीमा लाड यांचे मार्गदर्शन लाभले.

